दैनिक बीड
# पुण्यभूमी
संपादकः बाळासाहेब मस्के

बी.एम. प्रतिष्ठान
बी. एम. प्रतिष्ठान
महाराष्ट्र राज्य
संस्थापक अध्यक्ष
बाळासाहेब भगवानराव मस्के

बीड | मंगळवार, दि. १५ऑक्टोबर २०२४ | वर्षे४रे | अंक७३वा | पाने ६ | दररोजच्या घडामोडीसाठी वाचत रहा... पुण्यभूमी | https://Paper.epunyabhumi.in | RNI No : MAHAMAR/2021/81902 | ₹ ३

## भारत कॅनडाचे संबंध बिघडले

भारत आणि कॅनडामध्ये जवळपास वर्षभरापासून तणाव आहे. खलिस्तानी दहशतवादी हरदीपसिंग निज्जर याच्या हत्येमागे भारताचा हात असल्याचा आरोप कॅनडाने वर्षभरापूर्वी केला होता. मात्र, भारताने कॅनडाचे आरोप फेटाळून लावले होते. तेव्हापासून दोन्ही देशांमधील संबंध बिघडले आहेत. यातच कॅनडाने पुन्हा एकदा या प्रकरणाचा उल्लेख करत भारतीय उच्चायुक्त संजय कुमार वर्मा आणि इतरांचा या प्रकरणाच्या तपासात सहभाग असल्याचा आरोप केला, या आरोपानंतर भारताने एक पत्रक जारी करत कॅनडाने केलेले आरोप पूर्णपणे फेटाळून लावले. तसेच कॅनडा सरकारने केलेल्या आरोपाला उत्तर देताना हा ट्रूडो सरकारचा हा राजकीय अजेंडा असल्याचं म्हणत भारताने कॅनडाला फटकारलं.

# आंबेडकरी अनुयायांच्या मोर्चाने क्रांतीची मशाल पेटली

**आंबेडकरी जनता व्यापक आंदोलनाच्या पुन्हा तयारीत**

- पालकमंत्री, खासदार मोर्चाकडे साधे फिरकले ही नाहीत
- पोलिसांकडून मोर्चाला अर्धा तासापूर्वी परवानगी
- बाबासाहेबांच्या नावासाठी रक्त सांडले तरी माघार नाही
- राजकीय नेत्याने पोलिसांआडून दबाव टाकणे थांबवावे

## बीड रेल्वे स्टेशनला डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचेच नाव राहील!

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड शहरातील नियोजित रेल्वे स्थानकास भारतीय घटनेची शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव द्यावे, या प्रमुख मागणीसह इतर मागण्यांसाठी आंबेडकर अनुयायांनी सोमवारी बीड जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढला. या मोर्चात समाज बांधव मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. जोरदार घोषणाबाजीमुळे परिसर दणाणून गेला होता.

शहरात नव्याने होत असलेल्या रेल्वे स्थानकाच्या इमारतीवर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव लिहिलेले बॅनर व फोटो असलेला निळा झेंडा काही राजकीय नेत्यांनी पोलीस प्रशासनावर दबाव टाकून पोलिसांच्या माध्यमातून काढून टाकला. याच्या निषेधार्थ व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव रेल्वे स्थानकास द्यावे या मागणीसाठी जिल्हाधिकारी कार्यालयावर हा मोर्चा काढण्यात आला होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव असलेले बॅनर व फोटो असलेला निळा झेंडा बीड ग्रामीण पोलीस ठाण्याचे प्रभारी व त्यांच्या ४० ते ५० पोलीस कर्मचाऱ्यांनी काढल्यामुळे महापुरुषाचा अवमान पान २ वर...






**आमरण उपोषण सोडले :** बीड रेल्वे स्टेशनला डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव देण्यात आले असून त्या नावाची केंद्र सरकारने नोंद घ्यावी. या मागणीसाठी आंबेडकरी जनता रस्त्यावर उतरली आहे. आंदोलनाचा एक भाग म्हणून फौजी अनुरथ वीर बीड जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषणास बसले होते. सोमवारी त्यांनी आंदोलन कर्त्याच्या उपस्थितीत त्यांच्या मुलीच्या हस्ते पाणी घेऊन सदरील उपोषण सोडले.

**यांना ठेवले होते नजरकैदेत :** आंबेडकरी अनुयायांच्या आंदोलनाला पोलीस प्रशासनाच्या आडून सुरुवातीपासूनच दबाव टाकल्या जात होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकर रेल्वे स्टेशन नामकरण संदर्भात दि.९ रोजी आंबेडकरी अनुयायांकडून आंदोलन करण्यात आले होते. मात्र पोलिसांकडून आंदोलन कर्त्यांची धरपकड करण्यात आली. त्यामध्ये प्रशांत वासनिक, रजनीकांत वाघमारे यांना पेठ बीड पोलिसांनी दिवसभर नजर कैदेत ठेवलं होतं. त्यानंतर आंबेडकरी अनुयायांनी सोमवार दि.१४ रोजी मोर्चा काढणार असल्याचे घोषित केल्यानंतर पोलिसांनी अर्धा तास अगोदर परवानगी दिली. त्यामुळे आंबेडकरी अनुयायांच्या भावना तीव्र झाल्या होत्या.

### डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव देण्यास पाठिंबा

बीडमध्ये होत असलेल्या रेल्वे स्टेशनला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव देण्यात यावे. या मागणीला सर्व समाजातून पाठिंबा मिळत आहे.डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाला विरोध असण्याचे कारण नाही. या देशाचे सर्वोच्च व्यक्ती सिम्बॉल ऑफ नॉलेज म्हणून बाबासाहेबांना ओळखले जाते. त्यांची विद्वत्ता मोजता येत नाही एवढे महान कार्य बाबासाहेबांनी केले आहे. बीड रेल्वे स्थानकाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचेच नाव राहील यासाठी प्रशासनाने शासकीय स्तरावर पाठपुरावा करावा. अशी मागणी या मोर्चात सामील झालेल्या सर्व समाजाने केली.

# बीडमध्ये युवासेनेचा मेळावा उत्साहात

**पुर्वेश सरनाईक: बीडमध्ये बाजीराव चव्हाणांचे शक्तिप्रदर्शन**



बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

राज्याचे लोकप्रिय मुख्यमंत्री श्री. एकनाथजी शिंदे साहेब व खासदार श्रीकांत शिंदे यांच्यावर विश्वास ठेऊन महाराष्ट्रातील युवासेना राज्यात आपली पाळंमुळं मजबुत करण्यासाठी सज्ञ झाली आहे. त्याचेच अभुतपुर्व चित्र आज बीडच्या युवा सेनेच्या युवा संवाद मेळाव्यातुन दिसून आले. आरोग्य दूत बाजीराव चव्हाण हजारोंच्या संख्येने युवाशक्तीची रॅली काढुन आपल्या मागील युवासेना युवाशक्ती दाखवुन दिली आहे. युवासेना राज्यकार्याध्यक्ष श्री. पुर्वेशजी सरनाईक यांच्या उपस्थितीत आज बाजीराव दादा चव्हाण यांनी शेकडो बाईक, व चारचाकी व्दारे प्रचंड प्रमाणात युवासेना, युवाशक्ती सोबती घेत ना भुतो ना भविष्य अशी अभुतपुर्व रॅली बीड शहरातुन काढुन, बीड जिल्ह्यातील आजी माजी भावींना हादरा दिला आहे. त्यामुळे सुजान पुढाऱ्यांना बाजीराव चव्हाण यांची धास्ती नक्कीच बसली आहे.

आज बीडमध्ये युवासेनेचा युवा संवाद मेळावा संपन्न झाला त्यावेळी मेळाव्यास प्रमुख उपस्थिती म्हणून युवासेना राज्यकार्याध्यक्ष पुर्वेश सरनाईक हे उपस्थित होते. यावेळी बाजीराव चव्हाण यांनी आपल्याला विधानसभा लढवण्याची इच्छा व्यक्त केली. सोबत यांच्या हजारोंच्या संख्येने उपस्थित असलेल्या युवाशक्तीनेही आपल्या घोषवाक्यातुन बाजीराव चव्हाण यांनाच संधी मिळावी ही ईच्छा दर्शवीली आहे. कार्यक्रमात यावेळी युवासेना कार्याध्यक्ष पूर्वेश सरनाईक बाजीराव चव्हाण यांच्या बद्दल व्यासपीठावर बोलतांना म्हणाले की बाजीराव चव्हाण यांनी बीडमध्ये आजपर्यंत कोणीजे केलं नाही ते एकट्या बाजीराव चव्हाण यांनी जनसेवेचे काम करुन दाखवले आहे. बीडच्या लाखों गोरं गरीबांना आपल्या शस्त्रक्रिया साठी त्यांनी दहा कोटिंच्या वर वैद्यकीय मदत मिळवुन दिली आहे. तसेच आज पर्यंत त्यांनी आपल्या कार्यालयात पान २ वर...

# विकास हेच सोळंके कुटुंबाचे ध्येय

**आ. प्रकाश सोळंके: दिंद्रुड ते आडस रस्त्याच्या कामाचा शुभारंभ**



दिंद्रुड/पुण्यभूमी प्रतिनिधी

लोकनेते भूतपूर्व उपमुख्यमंत्री सुंदरराव सोळंके यांच्या पासून प्रेरणा घेत माजलगाव विधानसभा मतदारसंघाचा विकास हेच सोळंके कुटुंबाचे ध्येय गेल्या ४० वर्षांपासून असल्याचे मत आमदार प्रकाश सोळंके यांनी दिंद्रुड येथे दिंद्रुड ते आडस या २८ किलोमीटर सिमेंट कॉंक्रीट रस्त्याच्या कामाचा शुभारंभ प्रसंगी केले. दिंद्रुड येथील अक्षरा मंगल कार्यालयात रविवारी ते बोलत होते.

लोकनेते सुंदरराव सोळंके साहेब यांनी माजलगाव विधानसभा मतदारसंघाच्या विकासाचा मूलभूत पाया रचला. मतदार संघातील गावांना पाणी, आरोग्यसेवा सह सार्वभौम सुखसोयी देण्यासाठी मी गेल्या ३० वर्षांपासून तत्पर असल्याचे पुढे ते बोलले. दिंद्रुड ते अंबाजोगाई पान २ वर...

## राज्यपाल नियुक्त १२ आमदारांपैकी ७ जणांची नावं ठरली

मुंबई /पुण्यभूमी प्रतिनिधी

राज्य सरकारकडून राज्यपाल नियुक्त १२ आमदारांपैकी ७ आमदारांची नावं राज्यपालांकडे पाठवण्यात आली आहे. तर पाच जागा रिक्त ठेवण्यात आल्या आहे. भाजपला (इगझ) तीन, एकनाथ शिंदे यांच्या शिवसेना (डहळीं डशपर) आणि अजित पवारांच्या राष्ट्रवादीला (-क्षळीं झरुरी छउझ) प्रत्येकी दोन जागा देण्यात आल्या आहेत. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मंजुरी मिळाल्यानंतर राज्यपालांकडे सोमवारी फाईल पाठवण्यात आली. मात्र मंगळवारी सकाळपर्यंत कोणतेही नियुक्तीचे आदेश देण्यात आलेले नव्हते.

भाजप महिला आघाडीच्या प्रदेश अध्यक्ष चित्रा वाघ, पक्षाचे प्रदेश सरचिटणीस विक्रांत पाटील आणि वाशिम जिल्ह्यातील बंजारा समाजाच्या पोहरादेवी पान २ वर...

# डॉ.क्षीरसागरांचा विकासकामांचा धडाका

**धोरण: सहा कोटींच्या विकासकामांचे भूमिपूजन**



बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री अजितदादा पवार, राष्ट्रीय प्रवक्ते तथा पालकमंत्री ना.धनंजय मुंडे यांच्या माध्यमातून पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी पाठपुरावा करून मतदारसंघात कोट्यवधींचा निधी खेचून आणला आहे. बीड मतदारसंघाचा ५ वर्षाचा विकासाचा बॅकलॉग भरून काढत डॉ.क्षीरसागर यांनी चेहरा-मोहरा बदलण्याचा प्रयत्न केला आहे. मागील आठ दिवसात ६ कोटींच्या विकासकामांना प्रत्यक्षात सुरुवात झाली असल्याने ठिकठिकाणच्या नागरिकांमधून समाधान व्यक्त केले जात आहे.


प्रगतीपथावर असलेल्या विकासकामांमध्ये पालवण चौक परिसरात योगभूषण कॉलनी, शहेंशावली दर्ग्याच्या मागील बाजूस, प्रभाग क्रमांक २ मधील बारादरी, शिंदे यांचा मला, जुने सावरकर कॉलेज परिसर येथील अंतर्गत गल्ली, पंचशील नगर भागातील त्रिरत्न बौद्ध विहार परिसर, नवीन सरस्वती विद्यालय परिसरातील राधाकिसन नगर, प्रभाग क्र.१३ मध्ये विविध सिमेंट रस्ते व नाली बांधकाम, अंतर्गत ९ रस्ते, हायमास्ट सोलार दिवे बसविणे, हनुमान मंदिर येथे सामाजिक सभागृहाचे बांधकाम, सिंहगड कॉलनी नं.२ व जटाशंकर गल्ली, जालना रोड परिसरातील सागर हॉस्पिटल गल्ली, फुलाई नगर, कॅनॉल रोड परिसर, अंबिका चौक परिसर, अंकुश नगर परिसरातील नंदनवन कॉलनी, ग्रामीण पोलीस स्टेशन परिसर, कबाड गल्ली, पिंगळे गल्ली येथील गवळी समाज मंदिर, संत सावतामाळी सभागृह येथे कंपाउंड वॉल, इमामपूर रोड येथे मांग गारुडी समाजाचे सभागृह, स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या अर्धाकृती पुतळ्याच्या समोर छत बांधकाम, बंकटस्वामी महाविद्यालय परिसरात त्यागी निवास (जैन मंदिर) येथे कंपाउंड वॉल, चांदणी चौक परिसरात ढोर समाजाचे सामाजिक सभागृह, पेठ बीड भागातील लोणारपुरा परिसरात लोणार समाजाचे सामाजिक सभागृह, नाळवंडी नाका परिसरातील शास्त्रीनगर अंतर्गत सिमेंट रस्ता, गांधी नगर पान २ वर...

**निवेदन — मयुरी खेडकर-मस्के यांची जिल्हाधिकाऱ्यांकडे तक्रार**

# घरकुल योजनेतून लाभार्थ्यांना वगळले!

गेवराई/पुण्यभूमी प्रतिनिधी

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर घरकुल योजना तसेच इतर गोरगरीबांसाठी राबविण्यात येणाऱ्या योजनेतून गेवराई तालुक्यातील अनेक गावे तसेच शेकडो लाभार्थ्यांना वगळण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. याप्रकरणी गेवराई विधानसभा मतदार संघाच्या नेत्या मयुरी खेडकर-मस्के यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे तक्रार दाखल केली असून लाभार्थ्यांचा यादीत समावेश करण्याची मागणी केली आहे. दरम्यान घरकुलची मागणी केलेल्या लाभार्थ्यांचा सदरील घरकुल यादीत समावेश न केल्यास तिव्र आंदोलन छेडण्याचा इशारा या निवेदनाद्वारे मयुरी खेडकर-मस्के यांनी दिला आहे.



राज्यात इतर मागास समाजातील नागरिकांसाठी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर घरकुल राबविण्यात येत आहे. याचबरोबर पंतप्रधान आवास योजना, यशवंतराव चव्हाण घरकुल योजना बंजारा, वंजारी, वडार समाज तसेच रमाई घरकुल योजना, शबरी घरकुल योजना या सुद्धा योजनेतून गोरगरीबांना घरकुल देऊन हक्काचा निवारा शासनाकडून दिला जातो. दरम्यान गेवराई तालुक्यातील गावागावातून या योजनेत गोरगरीबांनी अर्ज दाखल करुन घरकुलची मागणी केली होती. मात्र या घरकुल यादीतून गेवराई तालुक्यातील अनेक गावे तसेच मागणी केलेल्या शेकडो लोकांची नावे वगळण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. मंजूर घरकुल योजनेमुळे इतर मागास समाजातील कुटुंबांना हक्काचे घर मिळणार होते. मात्र मागणी केलेल्या गोरगरीबांची नावे यादीत आलीच नाहीत. त्यामुळे गरजू लाभार्थ्यांचा घरकुल यादीत समावेश का करण्यात आला नाही? असा प्रश्न गेवराई विधानसभा मतदार संघाच्या नेत्या मयुरी खेडकर-मस्के यांनी उपस्थित केला आहे. तसेच ज्या लोकांनी घरकुल मिळावे यासाठी अर्ज दाखल केले, त्यांच्यावर अन्याय न करता मागणी केलेल्या प्रत्येकाला घरकुल देण्यात यावे. त्याचबरोबर वगळण्यात आलेल्या गावांना सुद्धा यादीमध्ये समाविष्ट करावे, यादीमध्ये कुठल्याही प्रकारच्या व्यक्तींवर अन्याय होता कामा नये, याप्रकरणी बीडचे जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांच्याकडे तक्रार देखील दाखल केली आहे. यामध्ये घरकुल योजनेतून वगळण्यात आलेल्या लाभार्थ्यांची नावे समावेश करण्याची मागणी करण्यात आली असून हि मागणी केलेल्या लाभार्थ्यांची नावे यादीत समावेश न केल्यास तिव्र आंदोलन छेडण्याचा इशारा मयुरी खेडकर-मस्के यांनी दिला आहे.

## काम दर्जेदारच होतील याची काळजी घेतली

**शिवराज पवार : विश्रामगृहाच्या बांधकाम इमारतीचे उदघाटन**

गेवराई /पुण्यभूमी प्रतिनिधी

मतदारसंघातील जनतेने आ.लक्ष्मण आण्णा पवार यांच्या नेतृत्वावर विश्वास व्यक्त केला तेव्हा पासून आ.आण्णांनी मतदार संघाची प्रमाणीक पणे सेवा करत मतदारसंघातील प्रत्येक काम पारदर्शकणे केले आहे त्यासाठी आण्णांनी मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध करून आणला आज मतदारसंघात मोठ्या प्रमाणात कामे सुरू असून गेवराई विधानसभा मतदारसंघाचे महाराष्ट्रात नाव मोठे व्हावे हेच आमच्या पवार कुटुंबाचे ध्येय आसल्याचे शिवराज पवार यानी उद्घाटन प्रसंगी बोलतांना सागितले

मतदारसंघाचेआ. लक्ष्मण आण्णापवार यांच्या विशेष प्रयत्नातून आज दि.१३ रोजी शिवराज पवार यांच्या शुभहस्ते गेवराई येथील नवीन शासकीय विश्रामगृह इमारतीचा भूमिपूजन सोहळा पार पडला यावेळी भाजपा तालुकाध्यक्ष प्रकाश सुरवसे,शिवसेनेचे तालुकाध्यक्ष शिनुभाऊ बेदरे, सुशील जवंजाळ, मधुकर तौर, अय्युब बागवान राजेंद्र पान २ वर...



### रस्ता कामांचे आज होणार उद्घाटन

तलवडारोड ते रेवकी देवकी गोदी रस्ता,रामपुरी ते ढालेगाव रस्ता,सुर्डी फाटा ते सेलु रस्ता, लोणाळा ते सिदफणा चिंचोली रस्ता, जातेगाव रोड ते मुदापुरी रस्ता,सावरगाव ते चिखली रस्ता,चंकलंबा रोड ते ब्रम्हगाव रस्ता वरील सर्व गावातील रस्ते मिळुन ४० कि.मी. रस्त्यासाठी आ.लक्ष्मण पवार यांच्या प्रयत्नातून मंजुरी मिळाली आहे त्या सिमेंट रस्ता कामांचा आ.लक्ष्मण पवार, व शिवराज पवार, यांच्या हास्ते आज मंगळवारी उद्घाटन होणार आहे .

## उद्योगाचे घरी देवता

लोकसत्ता' सातत्याने कारखानदारीचे (मॅन्युफॅक्चरिंग) महत्त्व अधोरेखित करीत आला आहे. सेवा क्षेत्र कितीही वाढले, नवउद्यामींचा कितीही गुणाकार झाला, सेन्सेक्स अगदी गगनास जरी भिडला तरी कारखानदारीचे मोल या कशास नाही. हे सर्व घटक हे अर्थव्यवस्थेस पूरक. न्याहारी ज्याप्रमाणे चौरस भोजनास पर्याय ठरू शकत नाही तद्वत या सर्व क्षेत्रांची वाढ कारखानदारीची जागा घेऊ शकत नाही. तथापि या सत्याकडे अलीकडे दुर्लक्ष करण्याचा नवाच 'उद्योग' अनेक जण करताना दिसतात. त्यात सत्ताधारी मग्न असल्यास ते एक वेळ समजून घेता येईल. कारण त्या बिचाऱ्यांसाठी 'जे बरे, ते खरे' असे वास्तव असते. तेव्हा कारखानदारीपेक्षा हा वर्ग नवनव्या उगवत्या क्षेत्रांचे गुणगान करणार यात नवल नाही. परंतु अर्थव्यवस्थेचे अभ्यासकही कारखानदारीपेक्षा सेवादी क्षेत्रांच्या घोडदौडीचे कौतुक करण्यात रममाण दिसतात. ही स्वत:ची फसवणूक. नुकत्याच जाहीर झालेल्या 'इंडेक्स ऑफ इंडस्ट्रियल प्रॉडक्शन'मुळे (आयआयपी) ही फसवणूक चव्हाट्यावर येते. हा निर्देशांक औद्योगिक उत्पादनाचा माग ठेवतो. कारखानदारीच्या कोणत्या क्षेत्राने कशी कामगिरी केली, कोण मागे आहे, कोण पुढे इत्यादी तपशील या निर्देशांकावरून लक्षात येतो. त्यात देशातील समग्र कारखानदारीचे प्रतिबिंब पडत असल्यामुळे खरे तर सेन्सेक्सपेक्षाही अधिक महत्त्व या 'आयआयपी'स असायला हवे. पण वास्तव तसे नाही. केवळ भांडवली बाजाराचा निर्देशांक असलेला सेन्सेक्स हा अधिक माध्यमस्नेही असल्याने आणि त्यात अनेकांचे हितसंबंध असल्याने त्यास अधिक महत्त्व दिले जाते. परिणामी आयआयपी दुर्लक्षित राहतो. नुकताच प्रसृत झालेला ऑगस्ट २०२४चा 'आयआयपी' मात्र अर्थव्यवस्थेस खडबडून जाग आणत असून त्याकडे दुर्लक्ष करणे परवडणारे नाही.याचे कारण गेल्या तब्बल २२ महिन्यांतील नीचांकी कामगिरी हा आयआयपी नोंदवतो. गेल्या वर्षीच्या ऑगस्ट महिन्यात कारखानदारीच्या या निर्देशांकाने त्याआधीच्या वर्षीपेक्षा तब्बल १०.९ टक्के इतकी वाढ नोंदवलेली होती. म्हणजे गतसाली या काळात कारखाने मोठ्या जोमाने काम करत होते. त्या तुलनेत यंदा मात्र हा निर्देशांक उणे ०.१ टक्के इतका नोंदवला गेला. म्हणजे वाढ सोडा; प्रत्यक्षात या कालखंडात देशात कारखानदारी आटली. सुमारे दोन वर्षांनंतर, म्हणजे ऑगस्ट '२२ नंतर, पहिल्यांदाच हा निर्देशांक इतका घसरला. त्या वर्षी या निर्देशांकातील घट ४.१ टक्के होती. आणि आता या वर्षी उणे. हे वास्तव धक्कादायक असून हे असे कसे झाले, याची चर्चा सुरू झाली आहे. सरकारच्या मते ऑगस्ट महिन्यात अतिवृष्टी झाल्याने हा निर्देशांक आटला. सरकारचे हे विनोदी विश्लेषण दोन घटकांच्या आधारे आहे. या काळात खचलेले खाणकाम आणि घटलेली वीज निर्मिती यामुळे या निर्देशांकावर परिणाम झाला, असा खुलासा सरकारतर्फे करण्यात आला. या महिन्यात खाण उद्योग साधारण चार टक्क्यांनी आकसला आणि वीज निर्मिती साडेतीन टक्क्यांनी कमी झाली. त्यामुळे हा निर्देशांक गडगडला, असे सरकारचे म्हणणे. त्यात तथ्य नाही असे नाही. पण ते अर्धे आहे. म्हणजे सरकारचे म्हणणे अर्ध-तथ्य ठरते. याचे कारण या काळात प्रत्यक्ष कारखानदारीही आकसली. त्यास पावसाचे कारण कसे लावणार? अतिवृष्टी झाली म्हणून कारखाने बंद पडत नाहीत की त्यामुळे औद्योगिक वापरावर परिणाम होत नाही. मोटारी तयार होत असतात, त्यांच्या सुट्या भागांची निर्मिती सुरू असते, सर्व औद्योगिक उत्पादनेही निर्माण होत असतात. तेव्हा पाऊस हे काही हा निर्देशांक घटीचे मुख्य कारण नव्हे. गतवर्षीच्या तुलनेत या काळात प्रत्यक्ष कारखानदारी जेमतेम एक टक्क्याने वाढली. केवळ वाढलेले पर्जन्यमान हेच जर हा निर्देशांक घसरण्याचे कारण असेल तर मग त्याआधी मार्च ते जुलै- म्हणजे पाऊस जोर धरायच्या आधीच्या- महिन्यांत या निर्देशांकाची कामगिरी नेत्रदीपक हवी. तसे झालेले नाही. यंदाच्या मार्च महिन्यापासूनच हा निर्देशांक घसरणीस लागलेला आहे असे उपलब्ध आकडेवारीवरून सहज ध्यानी येईल. या एप्रिलला सुरू झालेल्या आर्थिक वर्षाच्या पाचपैकी चार महिन्यांत हा निर्देशांक आकसला. एवढेच नाही तर गतवर्षीच्या एप्रिल-ऑगस्ट या काळात ६.२ टक्के इतका असलेला हा निर्देशांक यंदा मात्र ४.२ टक्के इतकाच नोंदला गेला. याचा अर्थ उघड आहे. केवळ अतिवृष्टी हे कारण यामागे असू शकत नाही. असे ठामपणे म्हणता येते याचे कारण २०१६ पासून या निर्देशांकाने इतकी घसरण पाहिलेली नाही. म्हणजे गेल्या आठ वर्षांत कधी अतिवृष्टी झालेली नाही, असे नाही.त्याच्या अनेक कारणांपैकी एक कारण आहे डोळ्यात येण्याची भीती. काहीही भव्य-दिव्य उभे राहते आहे असे दिसल्यावर त्या परिसरातील राजकीय 'ग्रामदेवता' वा त्यांचे अनुयायी त्याभोवती घिरट्या घालू लागतात. जेवढी गुंतवणूक मोठी, तितकी या ग्रामदैवतांची मागणी मोठी आणि तितकी त्या प्रमाणात त्यांना 'शांत' करण्याची किंमत अधिक. हे टाळण्यासाठी बरेच कारखानदार आपली उत्पादन आस्थापना अनेक लहान, लहान केंद्रांतून विभागतात. हे असे केल्याने ग्रामदेवता वक्री होण्याचे प्रमाण कमी होते हे खरे; पण त्यामुळे कारखान्यांच्या उत्पादन क्षमता आणि वाढीवरही परिणाम होतो. तसेच असे केल्याने कामगार संघटना आणि त्याबाबतची आव्हाने सांभाळणेही सोपे जाते. आपल्याकडे कामगार कायद्यांतील सुधारणा पुरत्या न झाल्याने आणि ज्या झाल्या त्यांची अंमलबजावणी पूर्ण ताकदीने होत नसल्याने गुंतवणूकदार मोठ्या गुंतवणुकीआधी दहा वेळा विचार करतात.

या सगळ्याचा परिणाम आपल्या औद्योगिक विकासावर मोठ्या प्रमाणावर होत असून मंदावलेला औद्योगिक निर्देशांक हे त्याचे एक लक्षण. या लक्षणाकडे वेळीच लक्ष द्यायला हवे. मोठ्या कारखानदारीस, गुंतवणुकीस पर्याय नाही हे वास्तव पुन:पुन्हा लक्षात घ्यायला हवे. ''उद्योगाचे घरी देवता लक्ष्मी वास करी'' हे केवळ गाणे घोकून चालणारे नाही. ते वास्तवात यायला हवे.

# श्री समर्थ कन्ट्रक्शनवर अॅट्रॉसिटी दाखल करा

## न्यायिक: नगरसेवक अॅड विकास जोगदंड यांची मागणी

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

१४ ऑक्टोंबर सन २०२४-२५ साठी बीड जिल्ह्यासाठी अनुसूचित जातीच्या लोकसंख्येच्या प्रमाणात लोकशाहीर आण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजनेअंतर्गत, अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांच्या वस्त्यांमध्ये पायाभूत सुविधा जसे की पाणी, मलनिसारण, जोड रस्ते, अंतर्गत रस्ते, व समाज मंदिर इत्यादी विकास



कामे या योजनेच्या माध्यमातून उपलब्ध करून अनुसूचित जाती व नव बौद्ध घटकांच्या वस्तीचा सर्वांगीण विकास करणे हा सदर योजनेचा मुख्य उद्देश असल्याने,राखीव प्रभागात अनुसूचित जाती प्रभाग व स्थानिक नागरिकांच्या मागणीनुसार रस्ते, नाल्या व इतर अत्यावश्यक विकास कामे करणेसाठी अंकी १०,५८,७१,३१८,अक्षरी :- १० कोटी ५८ लाख ७१ हजार ३१८ रु निधी उपलब्ध झाला आहे.

### असे चालणार नाही!

नगर परिषद बीड अंतर्गत बीड शहरात सुरु असलेल्या लोकशाहीर अण्णा भाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजनेतील प्रत्येक कामाच्या ठिकाणी ठळक पणे संपूर्ण तपशील सह फलक लावण्यात यावा. कामाच्या नावाचा उल्लेख न करता दिशाभूल करत सर्वसामान्यांची फसवणूक करणाऱ्या श्री समर्थ कन्ट्रक्शन बीड यांचेवर गुन्हा दाखल करून कठोर कार्यवाही करावी. लोकशाहीर अण्णाभाऊ साठेंच्या नावाने योजनेचा निधी चालतो परंतु त्यांच्या नावाचे फलक लावण्यास श्री समर्थ कन्ट्रक्शन बीड यांना जाणीवपूर्वक विसर पडतो ही खेदजनक बाब आहे.

असे की,त्यापैकी बीड येथील अनुसूचित जाती राखीव प्रभाग क्रमांक २ मधील अनुक्रमें शिव शारदा बिल्डिंग (जालना रोड) ते जिजामाता चौकपर्यंत सीसी रस्ता करणे. प्रभाग २ मधील चंपावती हार्डवेअर ते जालनेकर ट्रेडर्स पर्यंत सीसी रस्ता करणे.बीड येथील प्रभाग २ मधील संत सावता माळी चौक ते अमरधाम स्मशानभूमी पर्यंत सीसी रस्ता करणे इत्यादी तीन कामानां ४ कोटी २० लाख रु निधी देण्यात आला असून नगर परिषद बीड यांनी जा.क्र ४४८२/२०२४ दिनांक ३०/०९/२०२४ रोजी श्री समर्थ कंट्रक्शन बीड यांच्या नावे कार्यारंभ आदेश निर्गमित केले आहेत सदरील कामाचे उद्घाटन करत उद्घाटनाचा फलक लावत घाई गडबडीत धातूर-मातुर पद्धतीने काम सुरु केले असून.,नियमाप्रमाने काम कुठल्या योजनेतून करण्यात येत आहे तसेच प्रत्येक कामाचे नाव ठळकपणे फलकावर माहितीस्तव लावणे अनिवार्य असतांना ही

जातीय मानसिकतेने ग्रासलेल्या श्री समर्थ कन्ट्रक्शन बीड यांनी एकाच ठिकाणी फलक लावून योजनेचा उल्लेख न करता बेजबाबदार पणे कामाचे नावाच्या ठिकाणी बहुजनांची अस्मिता, थोरसाहित्य-सम्राट, लोकशाहीर अण्णाभाऊ साठेंच्या नावाचा उल्लेख केला असल्याने आमच्या सह तमाम अनुसूचित जातीतील माता, भगिनीं, समाज बांधवांच्या भावना दुखविल्या आहेत

लोकशाहीर अण्णाभाऊ साठेंच्या नावाने योजनेचा निधी चालतो परंतु त्यांच्या नावाचे फलक लावण्यास श्री समर्थ कन्ट्रक्शन बीड यांना जाणीवपूर्वक विसर पडतो ही खेदजनक बाब आहे म्हणून अनुसूचित जाती समाजाच्या भावना दुखविल्या बद्दल श्री समर्थ कन्ट्रक्शन बीड यांचे वर ट्रॉसिटी क्टनुसार गुन्हा दाखल करून कार्यवाही करण्यात यावी तसेच कामाच्या नावाचा उल्लेख न करता दिशाभूल करत सर्वसामान्यांची फसवणूक करणाऱ्या श्री समर्थ कन्ट्रक्शन बीड यांचेवर फसवणूकीचा गुन्हा दाखल करून कठोर कार्यवाही करण्यात यावी अशी मागणी मा. गृहमंत्री महाराष्ट्र राज्य तसेच मा. जिल्हाधिकारी यांचेकडे भिम स्वराज्य सेनेचे संस्थापक /अध्यक्ष तथा नगरसेवक ड विकास जोगदंड यांनी निवेदनातून केली आहे.

# लाडक्या बहिणींना १५०० रुपये मिळवण्याची आजची शेवटची संधी

## १५ ऑक्टोबरनंतर अर्ज होणार बंद!



मुंबई : राज्य सरकारने लागू केलेल्या मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेची गेल्या काही दिवसांपासून चांगलीच चर्चा आहे. या योजनेच्या माध्यमातून पात्र महिलांना प्रतिमहिन १५०० रुपये दिले जातात. आतापर्यंत या योजनेसाठी कोट्यवधी महिलांनी अर्ज दाखल केलेले आहेत. अजूनही राज्यभरातील महिला या योजनेचा लाभ घेण्यासाठी अर्ज करत आहेत. दरम्यान, ज्या महिलांनी अद्याप अर्ज दाखल केलेला नाही, त्यांना आजच्या दिवसाची ही शेवटची संधी आहे. कारण १५ ऑक्टोबरपासून लाडकी बहीण योजनेचे अर्ज बंद होणार आहेत.

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेची मुदत १५ ऑक्टोबरनंतर संपणार आहे. त्यामुळे या योजनेसाठी अर्ज करण्यासाठी महिलांकडे फक्त आजचा दिवस असणार आहे. महिला आपल्या भागातील अंगणवाडी सेविकांकडे हा अर्ज करू शकतात. सरकारने या योजनेत अर्ज करण्यासाठी एकूण चार वेळा मुदतवाढ दिलेली आहे. आतापर्यंत या योजनेसाठी एकूण २ कोटी ४७ लाख महिलांनी अर्ज दाखल केलेले आहेत. लाडकी बहीण योजनेची मुदत १५ ऑक्टोबरनंतर संपणार आहे.

### ३० सप्टेंबरपर्यंत होती मुदत

लाडकी बहीण योजनेची मुदत एकूण चार वेळा वाढवण्यात आलेली आहे. याआधी शेवटची मुदत ही ३० सप्टेंबर होती. मात्र अनके महिलांचे अर्ज दाखल करणे बाकी असल्यामुळे तसेच जास्तीत जास्त महिलांना या योनजेचा लाभ मिळावा, यासाठी सरकारने अर्ज करण्याची मुदत १५ ऑक्टोबरपर्यंत वाढवली होती. त्यामुळे या योजनेसाठी अर्ज करण्यासाठी आजचा शेवटचा दिवस असेल.

या योजनेच्या कोट्यवधी महिला लाभार्थी ठरलेल्या आहेत. काही महिलांना या योजनेचे पैसे बँक खात्यावर मिळत आहेत. पण पात्र ठरूनही अनेक महिलांना या योजनेचा लाभ मिळालेला नाही. बँक खाते आणि आधार क्रमांक एकमेकांशी लिंक असल्यास या योजनेचे पैसे थेट खात्यावर जमा होतात. त्यामुळे ज्या पात्र महिलांना या योजनेचे पैसे अद्याप मिळालेले नाहीत, त्यांनी आपले बँक खाते आधार क्रमांकाशी लिंक करणे गरजेचे आहे.

## पान एक वरून

**आंबेडकरी अनुयायांच्या मोर्चाने**

झाल्याचा आरोप करून या प्रकरणी पोलीस अधीक्षक बीड ग्रामीण ठाण्याचे पोलीस निरीक्षक व इतर ४० ते ५० पोलीस कर्मचाऱ्यांवर बडतर्फीची कारवाई करावी अशी मागणी यावेळी करण्यात आली. हा मोर्चा डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा ते जिल्हाधिकारी कार्यालय असा काढण्यात आला. या मोर्चात काही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलिसांचा तगडा बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

**बीडमध्ये युवासेनेचा मेळावा**

बसुन हजारो गोरं गरीबांचे विवीध प्रशन सोडवुन त्यांना न्याय मिळवून दिला आहे. आज बीड मधील जनता त्यांना आपला हक्काचा बाजीराव मानत आहे. त्यामुळे त्यांना येणाऱ्या विधानसभात निवडणुक लढवण्याची इच्छा व्यक्त करण्याचा त्यांना पुर्ण अधिकारी आहे. सोबतच बाजीराव चव्हाण हा एक शेतकऱ्यांचा पोरगा आहे एक सामान्य घरातुन आलेला शेतकऱ्याचा मुलगा आहे. आज महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेब यांच्या विश्वासाचा माणुस ते बनले आहेत. आज बीडकरांचा मणातला आपला माणुस बाजीराव चव्हाण हे बनले आहेत. त्यामुळे यांच्यावर मला पुर्ण विश्वास आहे की बाजीराव चव्हाण यांना वरिष्ठांकडुन ग्रिन सिग्नल मिळाला तर ते येणाऱ्या विधानसभा मध्ये नक्कीच आपल्या संधीचं सोनं करतील व बीडचा कायापालट केल्याशिवाय राहणार नाहीत. म्हणून मी खुद मुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेब व खासदार श्रीकांत शिंदे साहेब यांच्या कानावर बाजीराव चव्हाण यांचे काम व बीड मध्ये चालु असलेले त्यांचे विविध कार्य पोहचवणार आहे. तसेच त्यांना मी न्याय मिळवून देण्यासाठी त्यांच्या पाठीशी उभा आहे. कारण आजच्या रॅलीतुन बाजीराव चव्हाण यांनी दाखवून दिले की बीडमध्ये युवासेना पुर्ण त्यांनी मजबूत पणेउभा केली आहे. बीड जिल्ह्यातील हजारोंच्या संख्येने युवाशक्ती त्यांच्या पाठीशी ठामपणे उभी आहे. यावरुनच समजते की बाजीराव चव्हाण बीडमध्ये शिवसेनेचा खंबीर उमेदवार आहे. म्हणून युवासेना राज्यकार्याध्यक्ष पुर्वेश सरनाईक यांच्यावर खुश असल्याचे दिसून आले. या रॅलीस व युवासंवाद मेळाव्याला पुर्ण ताकतीशी यशस्वी करणारे युवासेना मराठवाडा निरीक्षक अविनाश जाधव, युवासेना जिल्हाप्रमुख सुमित कोळपे, जिल्हाप्रमुख अजय सुरवसे यांनी घेतले. वरील सर्व घडामोडींतुन दिसुन येते की बीडची विधानसभेची माळा बाजीराव चव्हाण यांच्या गळ्यात पडणार असल्याचे संकेत आहेत. त्यामुळे बाजीराव चव्हाण यांच्या हजारो युवा सैनिक, व कार्यकर्त्यांनी विधानसभेला बाजीराव चव्हाण यांच्या पाठीशी ठामपणे उभा राहण्याचे व त्यांना जिंकण्यासाठी आपली कंबर असलेली पुर्व दिशा आजच्या शक्ती प्रदर्शनातुन दिसुन आली आहे.

**विकास हेच सोळंके**

जाणारा हा रस्ताची अतिशय दुरावस्था झाल्यामुळे दळणवळणाला होणारा त्रास व मनस्ताप यापुढे जनतेला सहन करावा लागणार नाही अतिशय उत्कृष्ट प्रकारे या रस्त्याचे काम सर्व जनतेच्या निगराणीत आपण करणारा असून मतदारसंघाच्या विकासासाठी सोळंके कुटुंब सदैव तत्पर असल्याचे ते म्हणाले. अक्षरा लॉन्स येथे आयोजित कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी बहुजन विकास मोर्चाचे अध्यक्ष बाबुराव पोटभरे युवा नेते जयसिंह सोळंके यांच्यासह माजलगाव,वडवणी, धारूर तालुक्यातील पदाधिकारी या कार्यक्रमास उपस्थित होते. आमदार प्रकाश सोळंके हे सर्वसामान्यांसह दिनदलितांचे कैवारी असून मतदारसंघाच्या विकासासाठी त्यांचे ध्येय वाखाणण्याजोगे असल्याचे मत पोटभरे यांनी व्यक्त केले. आजोबा सुंदरराव सोळंके साहेब, काका प्रकाश दादा सोळंके यांच्या कर्तव्यतत्परतेचा अनुभव माझ्या पाठीशी असून मतदार संघासाठी मी सदैव जनतेसोबत सक्रिय असल्याचे मत युवा नेते जयसिंह सोळंके यांनी या कार्यक्रमात केले. या कार्यक्रमासाठी दिंद्रुड, देवदहिफळ, कांदेवाडी, कचारवाडी, हिंगणी बु.,हिंगणी खु. व्हरकटवाडी, मोहखेड, आमला, सुरनरवाडी, सिंगनवाडी, असरडोह येथील ग्रामस्थ उपस्थित होते.

**राज्यपाल नियुक्त १२ आमदारांपैकी**

संस्थानचे बाबूसिंग महाराज राठोड यांना भाजपने संधी दिली आहे. शिवसेनेकडून माजी खासदार हेमंत पाटील आणि माजी आमदार मनीषा कायंदे यांना विधान परिषदेवर पाठविण्यात येत आहे. राष्ट्रवादीकडून पंकज भुजबळ आणि इद्रिस नायकवडी यांना विधान परिषदेची आमदारकी देण्यात आली आहे.

भाजपने पक्ष संघटनेतील दोन जणांना विधानपरिषेदवर संधी दिली. तसेच बाबूसिंग महाराज राठोड यांना विधान परिषदेवर पाठवून बंजारा समाजाला संधी दिल्याचा संदेश भाजपने दिला आहे. तर एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेकडून मनीषा कायंदे दुसऱ्यांदा परिषदेवर संधी देण्यात आली आहे. तर अजित पवार यांच्या राष्ट्रवादीकडून निकटवर्तीयांना सधी दिल्याचे पाहायला मिळत आहे.

**काम दर्जेदारच होतील**

परिसरातील वडार समाज वस्ती, मोमीनपुरा भागातील कुरेशी मोहल्ला, धोंडीपुरा भागातील केंडेवाडा गल्लीत पेव्हर ब्लॉक, रस्ता व नाली, क्रांती नगर भागातील छत्रपती कॉलनी, धानोरा रोड भागातील महात्मा फुले नगर, बापूजी नगर या भागातील रस्ते व नाली, पेव्हर ब्लॉकसह सभागृह, बांधकामाचा समावेश आहे. तसेच, ग्रामीण भागात ५ कोटींचा निधी आहे. या सर्व कोट्यवधींच्या कामांच्या भूमिपूजन प्रसंगी ठिकठिकाणी डॉ.योगेश क्षीरसागर, डॉ.सारिकाताई क्षीरसागर यांच्यासह पक्षाचे प्रमुख पदाधिकारी, माजी नगरसेवक, सरपंच आदींची उपस्थिती होती.

**ग्रामीण, शहरी भागात बरोबरीने निधी दिला:डॉ.योगेश क्षीरसागर :** उपमख्यमंत्री अजितदादा, पालकमंत्री धनुभाऊ यांच्या माध्यमातून शासन, प्रशासनाकडे पाठपुरावा करून वर्षभरात बीड विधानसभा मतदारसंघात ग्रामीण, शहरी भागात आपण बरोबरीने निधी दिला. नुकतेच आठ दिवसात ७ कोटींच्या कामांना सुरुवात केली आहे. नागरिकांना अधिकाधिक नागरी सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्नशील असतो. कामे दर्जेदार करून घेण्यासाठी माझ्यासह यंत्रणेचे लक्ष असते, असे डॉ.योगेश क्षीरसागर यांनी म्हटले आहे.

**काम दर्जेदारच होतील**

राक्षसभुवनकर, भगवान घुंबार्डे, राहुल खंडागळे,दादासाहेब गिरी, जान मोहम्मंद बागवान,नगरसेवक कृष्णा काकडे, राजाभाऊ आर्दड, भरत गायकवाड, आप्पासाहेब कानगुडे, संजय इंगळे,न किशोरजी धोंडलकर, फिरोज शेठ, मुन्ना शेठ, राम पवार, मा.उपनगराध्यक्ष मधुकर आप्पा वादे, सतीश दाभाडे सरपंच नंदू गरड,शिराळाचे सरपंच माऊली जाधव, ज्ञानेश्वरजी पवार,बंजारा क्रांती दलाचे जिल्हाध्यक्ष लक्ष्मण चव्हाण,विष्णुपंत आतकरे,राजेभाऊ मातकर, शरद मोटे,गणेश मोटे,विठ्ठल मोटे, समाधान मस्के,कदीरभाई बागवान, बेद्रे,करण जाधव,अमोल मस्के,माजेद भाई,गोरख मोटे,मुन्ना मोटे, रंजीत डरपे,ऋषिकेश मोटे,मुस्ताक भाई कुरेशी, मोंटी माटे,अरुण पवार,गणेश पवार,संतोष राठोड,आसेफ काजी,शेख उस्मान,फाहत भाई चाऊस,शोएब भाई,कृष्णकांत पाटील, रोहितजी राठोड,विष्णुपंत शेलार,मुरली अण्णा सुतार, दिपक शेलार,इमरान भैया पठाण,बळीभाऊ करे,विलास शिंदे,रविराज आहेर,विक्रम भोसले,योगेश मोटे,रमेश राठोड,सुंदर धस,योगेश मोटे,बाबभाई फिटर,जफर टेलर,सादेक चाचू,शेख नईम,प्रल्हादजी येळापुरे,संजय आंधळे कृष्णा पाटोळे व इतर कार्यकर्ते आणि पदाधिकारी तसेच समस्त गेवराई कर उपस्थित होते.

## पान सहा वरून

**स्वारातीचे डॉक्टर नोटा**

आणि ज्युनियर शिकावू विद्यार्थ्यावर जबाबदारी टाकतात.नाविलाजाने रूग्णाला आपली परिस्थिती नसताना खासगी रुग्णालयाची पायरी चढावी लागते. हे सिनियर डॉक्टर आपल्या खासगी आलिशान हॉस्पिटलमध्ये चांगली सेवा देतात.रुग्णांना आपल्या खासगी हॉस्पिटलमध्ये येण्याची सक्ती करतात व रुग्णाला बकरा बनवतात. याबाबत शहरातील नामांकित राजकीय नेते तथा सामाजिक कार्यकर्ते यांना हा प्रकार माहित असून सुद्धा त्यांनी हाताची घडी आणि तोंडावर बोट ठेवलं आहे. यावर रुग्णालय प्रशासन सोईस्करपणे डोळे झाक करीत आहे. आता या सिनियर डॉक्टरांवर कारवाईचे'इंजेक्शन' टोचले जाते की पाठीशी घालून व्हिटॅमिन दिले जाते हे पाहणे औत्सुक्याचे ठरेल.

**गाव विकासात सोळंके**

देवठाणा जैतापूर ग्रामपंचायत च्या ग्रामस्थांच्या वतीने सहृदय आभार व्यक्त करण्यात आले. या कार्यक्रमास धारूर तालुक्यातील विविध गावचे सरपंच, उपसरपंच पदाधिकारी उपस्थित होते.जैतापुर येथे रेल्वे स्टेशन ते जुना कुंडी फाटा पर्यंत रस्ता व पुलाचे काम, जैतापूर ते सुकळी रस्त्यावरती जैतापूर गावाजवळ मोठा सिमेंट पूल, देवठाणा नदीवरील गेटेड बंधारा, जैतापूर येथे अंगणवाडी बांधकाम , देवठाणा ग्रामपंचायत कार्यालय इमारत, जैतापूर ते सुकळी रस्ता सुधारणा व जैतापूर येथे वाटर फिल्टरचा प्रोजेक्ट आदी कामांचे शुभारंभ या एकूण ९ कोटी ७० लक्ष रुपयांच्या कामाचा लोकार्पण व उद्घाटन सोहळा यावेळी संपन्न झाला.

**लोणी येथील कार्यकर्त्यांचा**

पिकलं देवकते, संदिपान देवकते, अभिजित काचगुंडे, दत्ता काचगुंडे, अरुण काचगुंडे, अंगद सातपुते यांच्यासह असंख्य युवकांचा प्रवेश राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षात प्रवेश झाला. आदरणीय खा.शरदचंद्रजी पवार साहेब उत्तुंग व्यक्तिमत्व आहेत. त्यांच्या विचारांनी व कार्याने प्रभावित होऊन अनेक युवक पक्षामध्ये प्रवेश करीत आहेत. त्या सर्वांचे मन:पूर्वक स्वागत करतो. अनेक पदाधिकारी व तरुण सहकाऱ्यांच्या पक्ष प्रवेशाने परळी विधानसभा मतदारसंघात पक्ष संघटना नक्कीच बळकट होईल व राष्ट्रवादीची ताकद देखील वाढणार आहे. त्यादृष्टीने सर्वांनीच पक्षाची ध्येय धोरणे तळागाळापर्यंत पोहोचविण्याचे काम एकजूटीने करावयाचे आहे,असे आवाहन युवा नेते राजेभाऊ फड यांनी केले. दरम्यान राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेश अध्यक्ष आ.जयंत पाटील, जिल्हाध्यक्ष आ. संदिप क्षीरसागर यांच्या सूचनेनुसार परळी वैजनाथ राष्ट्रवादी कॉंग्रेस भटक्या विमुक्त सेलच्या परळी वैजनाथ तालुका सचिवपदी लोणी येथील युवा नेतृत्व भागवत कचगुंडे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. राजेभाऊ फड यांच्या हस्ते दिले नियुक्तीपत्र देण्यात आले आहे. आदरणीय खा.शरदचंद्रजी पवार यांच्या विचारानुसार पुढील काळात पक्षाच्या माध्यमातून सर्वसामान्यांच्या विकासांत आपण भरीव कार्य कराल व पक्ष संघटना अधिक मजबुतीने उभी कराल ही अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे. या निवडीचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे. यावेळी राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे शहराध्यक्ष जिवनराव देशमुख, भटक्या विमुक्त सेल अध्यक्ष गणेश देवकते, मुक्ताराम गवळी आदी उपस्थितीत होते.

**'मांजरा'चे दोन दरवाजातून**

पाणीच पाणी झाले होते. सध्या सर्वत्र सोयाबीन काढणी व कापूस वेचणी सुरु आहे. अशा स्थितीत पाऊस पडल्यास पिकाचे नुकसान होण्याची भित शेतकऱ्यांकडून व्यक्त केली जात आहे. पाण्याचा विसर्ग केला जात आहे. तर १० ऑक्टोबर धरणाचे उघडलेले दोन दरवाजे बंद केले होते. दरम्यान, सध्या पाऊस नसला तरी मांजरा नदीतून पाण्याची आवक सुरू झाल्याने रविवारी सकाळी ७ वाजता पुन्हा धरणाच्या सांडव्याचे द्वार क्र. १ व ६ हे दोन दरवाजे २५ सेंटीमीटरने उघडून १७४७ क्यूसेसने नदीपात्रात पाण्याचा विसर्ग केला जात आहे. तर २५ सप्टेंबरपासून १२ ऑक्टोबरपर्यंत या १५ दिवसात धरणातून तब्बल ४९.९२९ दलघमी इतका पाण्याचा विसर्ग मांजरा नदीत करण्यात आला आहे. अशी माहिती मांजरा धरणाचे शाखाधिकारी सुरज निकम यांनी दिली.

**ठरवाल ते धोरण,बांधाल**

घेताल तो निर्णय आमच्यासाठी मान्य असेल. असा एकमुखी निर्णय यावेळी उपस्थिती कार्यकर्त्यांनी घेतला आहे.यावेळी अनेक गावच्या सरपंचासह प्रमुख कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.या माध्यमातून नितीन नाईकनवरे वरचे संकेत मिळताच कामाला लागले असल्याचे दिसत आहे.

**शंभर टक्के अनुदान देण्याचा**

आमच्या या मागणीचा गांभीर्याने विचार करून २४ नोव्हेंबर २००१ पूर्वीच्या वरिष्ठ महाविद्यालयांना शंभर टक्के अनुदान देण्याचा निर्णय विधानसभेची आचारसंहिता लागण्यापूर्वी मंत्रिमंडळाच्या बैठकीमध्ये तात्काळ घ्यावा. ही पुन्हा एकदा आमची नम्र विनंती आहे. अशा आशयाचे पत्र महाराष्ट्र राज्य कृती समितीच्या वतीने प्राचार्य डॉ. बी. डी. मुंडे यांनी अजीतदादांना पवार यांना पाठवले आहे .

**शेतीसाठी शेकापचा खटारा**

पक्षाचे भाई ड नारायण गोले पाटील यांच्या खटारा चिन्ह समोरील बटन दाबून जातीसाठी नाही तर मातीसाठी आणि शेतीसाठी शेतकरी कामगार पक्षाचा खटारा विधानसभेत पाठवा असे अवाहन सिमरी पारगाव येथे नागरिकांशी संवाद साधताना भाई ड नारायण गोले पाटील यांनी केले. यावेळी शेकडो गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

संपादक : **बाळासाहेब भगवान मस्के**, कार्यकारी संपादक : **सुनिल मसू डोंगरे**
हे दैनिक प्रकाशक,मुद्रक,मालक,संपादक बाळासाहेब भगवान मस्के यांनी बी.एम.प्रिंटर्स अॅन्ड पब्लिकेशन, बीड, ता.जि.बीड येथे छापून दैनिक बीड पुण्यभूमी तहसीलच्यामागे, डीपी रोड बीड (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.
(अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.) न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत दुरध्वनी-०२४४२-२९९०८४,ई-मेल-beedpunyabhumi@gmail.com
Daily Beed punyabhumi hews paper owner, publisher, Edit Balasaheb Bhagwan Maske has printed at B.M. printexs, behing the tehsil, dp road (Maharashtra) 431122
Published at daily Beed Punyabhumi office, behing the tehsil, dp road, beed -431122 Phone No. (02442)299084, Email-beedpunyabhumi@gmail.com

# तुफान पावसाने झोडपलं गाव अन् शिवार

## अस्मानी बनोटी,जरंडी मंडळात अतिवृष्टी





सोयगाव/पुण्यभूमी प्रतिनिधी

सोयगाव तालुक्यातील बनोटी,आणि जरंडी या दोन मंडळात रविवारी रात्री साडे अकरा वाजता तुफान पावसाने सुरुवात केली तब्बल ७० मिनिटांचा या मुसळधार पावसाने बनोटी मंडळात १०० मी मी पाऊस झाला असून जरंडी मंडळात ६७ मी मी नोंद झाली आहे दरम्यान घोसला शिवारात गट क्र-७४ मधील शेतात शेडवर गेलेल्या शेतकऱ्याच्या अंगावर वीज पडून रात्री साडे अकरा वाजता जागीच मृत्यू झाला आहे

युवराज पूना गव्हांडे(वय ५५) असे वीज कोसळून ठार झालेल्या अल्पभूधारक शेतकऱ्यांचे नाव असून घोसला शिवारातील गट क्र-७४ मध्ये रात्री नऊ वाजता जेवण करून शेड मध्ये झोपायला गेले असता रात्री झालेल्या विजांच्या कडकडाट व मुसळधार पावसाने त्याचा जागीच मृत्यू झाला आहे महसूल ने घटनास्थळी पंचनामा केला आहे

गोंदेगाव सह बनोटी परिसरात झालेल्या ढगफुटी सदृश पावसाने सर्व नद्या रात्री तीन वाजेपर्यंत दुथडी भरून वाहत होत्या दरम्यान बनोटी मंडळातील ४३ गावांना या अतिवृष्टी च्या पावसाचा मोठा तडाखा बसला आहे ४३ गावांतील पिके पाण्यात बुडून उभी असून कपाशी सह मका सोयाबीन आदी पिकांची नुकसान झाले आहे तर जरंडी मंडळात १८ गावे बाधित झाली आहे दरम्यान महसूल आणि कृषी विभागाने तातडीने पिकांच्या नुकसानी ची पाहणी करण्याचे आदेश दिले असून तलाठी कृषी सहायक यांना दोन दिवसात नुकसानी चा अहवाल सादर करण्याचे निर्देश तहसीलदार मनीषा मेने जोगदंड यांनी दिले आहे सायंकाळी उशिरा जरंडी गावातील नुकसानी च्या पाहणी साठी तालुका कृषी अधिकारी मदन सिसोदिया तहसीलदार मनीषा मेने-जोगदंड आदींनी जरंडी शिवारात नुकसानीची पाहणी केली आहे दरम्यान तिडका गावात गल्लीबोळातील पाणी थेट घरात शिरून घरातील कापूस भिजून खराब झाल्या ची घटना रात्री एक वाजेच्या दरम्यान घडली आहे येथील शेतकऱ्यांचा वेचणी करुन घरात ठेवलेला कापुस रविवारी मध्यरात्रीला झालेला जोरदार पावसामुळे गल्ली बोळाचे पाणी घरात शिरल्याने पुर्ण कापुस पाण्यात भिजला.

शेतकरी शे मुबारक शेख बशीर,नाजीम शेख,रहीम शेख मुबारक यांनी पाच सात दीवसापुर्वी जवळपास ५० क्वीटंल कापुस वेचणी करुन घरात ठेवलेला होता पाणी थेट घरात शिरून नुकसान झाले आहे गोंदेगाव येथील गवळण नदिसह बनोटी, वरठाण,तितुर,मुखेड आदी ठिकाणी पूरग्रस्त स्थिती निर्माण झाली होती.

> तालुक्यातील बनोटी, जरंडी मंडळात रविवारी रात्री अकरा वाजेनंतर झालेल्या अतिवृष्टी च्या पावसाने झालेल्या नुकसानी चे अहवाल व वस्तुनिष्ठ पंचनामे करून दोन दिवसात सादर करण्याचे आदेश सोमवारी तलाठी मंडळ अधिकारी यांना दिले आहे त्यामुळे शेतकऱ्यांनी काळजी करू नये बाधित शेतकऱ्यांना मदत मिळेलच
>
> -मनीषा मेने जोगदंड,तहसीलदार सोयगाव

> जरंडी मंडळात अतिवृष्टी चा पाऊस झालेल्या आहे या पावसामुळे झालेल्या नुकसानी ची पाहणी करण्यासाठी सकाळीच कृषी पथक थेट शेतकऱ्यांच्या बांधावर गेले आहे मंगळवारी नुकसानी ची आकडेवारी हाती येईल
>
> -मदन सिसोदिया
>
> तालुका कृषी अधिकारी सोयगाव

## रोटरी क्लब ऑफ बीडचा सन्मान

### धोरण: नऊ दिवस दररोज राबविला उपक्रम



बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

स्त्री भ्रूण हत्या प्रकरणात बीड जिल्ह्याचे नाव देशात गाजले होते. याच जिल्ह्यात मुलींच्या जन्माचा दर अत्यंत्य कमी आल्याचा धक्कादायक आकडा समोर आला आहे. हा कलंक पुसण्यासाठी शासन स्तरावर तसेच विविध सामाजिक संघटना प्रयत्नशिल आहेत. या कामात रोटरीनेही सहभाग नोंदवत जिल्हा रुग्णालयात जन्मलेल्या १८० कन्या मातांचा साडी, चोळी देऊन सन्मान केला. निमित्त होते नवरात्रोत्सवात जन्मलेल्या कन्यांच्या जन्माच्या स्वागताचे.

मुलांच्या जन्माचा सोहळा साजरा केला जातो. परंतु मुलींच्याही जन्माचे स्वागत व्हायला हवे असा संदेश देण्याकरीता रोटरी क्लब ऑफ बीडच्या वतीने जागर शक्तीचा सन्मान स्त्री जन्माचा या उपक्रमांतर्गत यंदा जिल्हा रुग्णालयात नवरात्रात जन्मणाऱ्या कन्येचा आणि मातांचा सन्मान करण्यात आला. रोटरीच्या वतीने नवरात्रोत्सवातील नऊ दिवसात रोज कन्या मातांना साडी चोळी, ड्रेस भेट देण्यात आली. अशा एकूण १८० मातांचा सन्मान करण्यात आला. या उपक्रमासाठी जिल्हा रुग्णालयातील चिफ मेट्रन रमा गिरी, संगिता महानरवर, विद्या कुलकर्णी, सीमा दुबे, कमल सिरसाट, आशा माने, कमल सुतार यांचे विशेष सहकार्य लाभले. रोटरी क्लब ऑफ बीड चे अध्यक्ष डॉ मेघराज पिंगळे, सचिव संदीप खोड , कमलेश मुंदडा, सुरज लाहोटी, डॉक्टर अमोल जोगदंड गणेश सोळंके,वाय जे राव, डॉ सचिन वारे संकेत कदम सुनील खंडागळे सुमित जैस्वाल, डिस्ट्रिक्ट सेक्रेटरी सतीश लोणीकर यांनी पुढाकारातून जागर शक्तीचा सन्मान स्त्री जन्माचा कार्यक्रम घेतला. कार्यकमासाठी रोटरीचे पदाधिकारी उपस्थित होते.

## महाआरोग्य शिबिराचा यज्ञ अविरत

### उपक्रम: जयदत्त क्षीरसागर यांची संकल्पना



बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

काकू-नाना प्रतिष्ठान आयोजित योग प्रणायाम ३६५ दिवस योगाभ्यास द्वारे सुदृढ व निरोगी जीवनाचा मूलमंत्र जोपासला जातोच त्याच बरोबर महात्मा गांधी रुग्णालया द्वारा फिरता दवाखाना या संकल्पने मधून गाव, वस्ती, वाडया, तांडा येथील रुग्णांच्या आरोग्याची काळजी घेत माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी सुरू केलेला महा आरोग्य शिबिराचा यज्ञ अखंड सुरूच आहे.

सोमवार दि. १४ ऑक्टोबर २०२४ रोजी मुर्शदपुर, अव्वलपूर, सोनगाव येथे मोफत सामुदायिक आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. हे शिबीर १५ ऑगस्ट२०२४ पासून नियमित राबवले जात आहे. शिबिरात राजुरी(नवगण), लिंबागणेश, पाली, पिंपळनेर, नाळवंडी, चौसाळा सर्कलच्या गावा-गावांतून, वस्ती, तांड्यावरील समाजातील दुर्बल घटकांसह विविध आजारांनी ग्रासलेल्या पिडीतांना सर्वोत्तम आरोग्यसेवा पूरवत आहे. या शिबिरात आजपर्यंत जवळपास ४५०० रुग्णांची विनामूल्य तपासणी करून शेकडो रुग्णांची मोफत इसीजी तसेच रक्त तपासणी तज्ञ व अनुभवी डॉक्टरांच्या पथकाद्वारे करण्यात आली.हे शिबिर लोकनेते माजी मंत्री जयदत्त आण्णा क्षीरसागर यांच्या संकल्पनेतून काकू-नाना प्रतिष्ठानचे सचिव डॉ.अरुण भस्मे, आदर्श शिक्षण संस्थेचे प्रशासन अधिकारी राजा मचाले, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.महेंद्र गौशाल, उपप्रचार्य डॉ. गणेश पांगारकर, डॉ.अंजली पवार यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ.अंजली क्षीरसागर, डॉ.अमृता आगवान, डॉ. विश्वजीत बोंडार, डॉ.आनंद दाभाडे, डॉ.योगेश धुमक यांच्या समन्वयाने यशस्वी पणे राबवले जात आहे.

## सिरसाळा येथे धम्मदेशना उत्साहात

### अध्यात्मिक:भदंत महाविरो यांनी दिली धम्मदेसना



सिरसाळा/पुण्यभूमी प्रतिनिधी

सम्राट अशोक बुद्ध विहार सिरसाळा येथे ६८ वा धम्मचक्र प्रवर्तन दिना निमित्त भदंत महाविरो प्रमूख मार्गदर्शक म्हणुन उपस्थीत होते. या कार्यक्रमाची सुरूवात तथागत गौतम बुद्ध, चक्रवर्ती सम्राट अशोक व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांना आयु. रोहीदास अरसूळे, आयु . मधुकर किरवले, आयु.सुभाष चोपडे, आयु.अमोल किरवले, आयु.मिलींद चोपडे यांच्या हस्ते पुष्प दीप व धुपाणे अभिवादन करण्यात आले. यशोधर महीला मंडळाने याचना केल्या नंतर भदंत महाविरो यांनी उपस्थितांना त्रीसरण व पंचशिल देऊन कार्यक्रमाची सुरुवात झाली.

भदंत महावीरो यांनी उपस्थितांनी धम्मदेशनं देतांना तथागतचा धम्म अगदी सोप्या भाषेत समजावून सांगितला. ते म्हणाले की जीवन हे क्षणभंगुर आहे. ज्याला सुखाने मारायचे आहे त्याने सुखाने जगले पाहिजे. बौद्ध म्हणुन जगताना आपली फार मोठी जबाबदारी असुन आपण वागण्यातून ईत्तरासमोर आदर्श निर्माण केला तर धम्मचक्र अधिक वेगाने गतिमान होईल. आयु. प्रमोद किरवले यांनी ही उपस्थितांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचा शेवट सरणांतय घेऊन करण्यात आला.कार्यक्रमाचे सूत्रसंचलन आयु . साहेबराव किरवले व प्रास्ताविक प्रा.दयानंद झिंजुर्डे यांनी केले. यावेळी आयु.अच्युत बाप्पा किरवले यांनी सर्वांना खीर दान केले. या प्रसंगी डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समिती सदस्य, यशोधर महिला मंडळ व मोठ्या प्रमाणात उपासक उपस्थित होते.

## सोयाबीन खरेदीसाठी नोंदणी



केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

केज खरेदी विक्री संघात सोयाबीन खरेदी साठी नाव नोंदनी चालु झाली आहे केज तालुक्यातील शेतकरी बांधवानी लवकरात लवकर नोंदनी करावी .केज तालुक्यातील सोयाबीन पिकवणारे शेतकरी बांधवानी केज येथील खरेदी विक्री संघात शासन सोयाबीन खरेदी करणार आसुन त्यासाठी लागणारे कागदपत्र १)आधार कार्ड २)बॅक पासबुक ३) सोयाबीन पिकपेरा आसलेली २४/२५ या सालाची सातबारा ८अ चा उतारा १ फोटे हे कागद पत्र लागणार आसुन या साठी लवकरात लवकर केज खरेदी विक्री संघात आपले नाव नोंदवावे असे आवाहन खरेदी विक्री संघाचे चेअरमन बालासाहेब बोराडे केले आहे .

## हुतात्मा विश्वनाथ राजहंस यांचे नाव

### ऐतिहासिक:नामकरण करतांना नातू विशाल राजहंस




सोयगाव/पुण्यभूमी प्रतिनिधी

सोयगाव च्या शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे नामकरण करून सोमवारी हुतात्मा विश्वनाथ कालिदास राजहंस असे नामकरण त्यांचे नातू विशाल राजहंस यांच्या हस्ते नाम फलकाचे सोमवारी दुपारी एक वाजता नामकरणं करण्यात आले

कौशल्य विकास व उद्योजकता विभाग शासन निर्णय ८ ऑक्टोबर अन्वये शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेला हुतात्मा विश्वनाथ राजहंस यांचे नांव देण्यात आले त्यानिमित्त सोमवारी दुपारी शासकीय औद्योगिक प्रशिक्षण प्रशिक्षण संस्था सोयगाव या संस्थेचे नामकरण सोहळा पार पडला या नामांकन सोहळा प्रमुख उपस्थिती हुतात्मा विश्वनाथ राजांस यांचे पुतणे उमेश राजहंस व नातू विशाल राजहंस, सुनील बोडखे यांची उपस्थिती होती सदरील कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सोमनाथ उगले यांनी केले व कार्यक्रमाचे प्रस्तावित रेणुका कुलकर्णी यांनी केले व कार्यक्रमाचे आभार नीता दांदळे यांनी केले डी एम बागुल, एस ए लोखंडे, एम एम नेहेते,पी. बी रावते आदींची यावेळी उपस्थिती होती.

## खो खो अजिंक्यपद निवड चाचणी

बीड /पुण्यभूमी प्रतिनिधी

शनिवार दि.१९/१०/२०२४ रोजी एमॅच्युअंर खो-खो असोसिएशन, बीड व शारदा स्पोर्ट्स अकॅडमी गेवराई, यांच्या संयुक्त विद्यमानाने जगदंबा आय.टी.आय.येथे.सकाळी ठिक ९:३० वाजता स्पर्धा सुरू होईल. जिल्हा अजिंक्यपद व निवड चाचणी खो-खो स्पर्धा कुमार-मुली गटाचे चे आयोजन करण्यात आले आहे. निवड झालेल्या संघातील खेळाडू धाराशिव येथे दि.२७ ते ३० ऑक्टोबर दरम्यान होणाऱ्या राज्यस्तरीय खो खो स्पर्धेत बीड जिल्ह्याचे नेतृत्व करणार आहेत. या निवड चाचणीसाठी तज्ञ अशी निवड समिती खालील प्रमाणे आहे. मनोज जोगदंडबीड, बापूसाहेब तारुकर गेवराई, रमेश पिसाळ वडवणी, श्रीमती सुनीता जायभाये बीड, नितीन पुटवाड - माजलगाव १८ वर्ष वयोगट कुमार/मुलीया गटातील खेळाडूंचा जन्म १/१/२००६ च्या नंतरचा असावाव त्याचे मूल्यांकन वय +उंची+वजन २५० पेक्षा जास्त असू नये. खो-खो खेळाडूंनी व संघाने निवड चाचणीत जास्ती जास्त संख्येने सहभाग घ्यावा. असे आव्हान शारदा स्पोर्ट्स अकॅडमी चे संचालक मा. श्री रणवीर राजे पंडित व संघटनेचे अध्यक्ष श्री ऋषिकेश शेळके, सचिव विजय जाहेर यांनी केले आहे.

## हत्तेचा प्रयत्न केल्याच्या आरोपातून निर्दोष

### निकाल: सबळ पुराव्या अभावी मुक्तता



आंबाजोगाई/पुण्यभूमी प्रतिनिधी

फिर्यादी अंजली भ्र. दयानंद सोनवणे बाभळगाव ता. अंबाजोगाई जि-बीड यांनी पो-से-बर्दापुर येथे दि: २६/०४/२०२२ रोजी येथे दिलेल्या फिर्यादीवरून गु.र. न. ६४/२०२२ दि: ३०/०४/२०२२ रोजी अन्वये गुन्हा कुलम. ३०७.४९८-३२४ ३२३, ५०४, ५०६,३४ भी.द-वी . अन्वये गुन्हा अरोपी विनायक निवृत्ती सोनवणे, महानंदा उर्फ मंगलबाई विनायक सोनवणे, व शीतल प्रशांत चाटे हे सर्व राहणार बाभळगाव ता. अंबाजोगाई यांच्या विरुद्ध दोषारोपपत्र दाखल होऊन त्यामध्ये में सरकार पक्षातर्फे एकुण ६ साक्षीदार तपासण्या आले व आरोपिचे वकील अँड. श्रीनिवास विलासराव कुलकर्णी (पाटोदकर ) यांनी आरोपी च्या वतीने भक्कम युक्तिवाद केला असता मे. अ. जिल्हा व सत्र न्यायाधीश मे. एस. जे. घरत यांच्या न्यायालयाने आरोपिंची सबळ पुराव्या अभावी निर्दोष मुक्तता केली, -अरोपीचे वकील ॲड. श्रीनिवास विलासराव कुलकर्णी (पाटोदाकर) यांना अँड. विशाल घनशाम घोबाळे व अँड. संतोष हनुमंतराव देशपांडे, अँड वसंत. बी.हजारे यांनी विशेष सहकार्य केले.

## निवड आशिष भालेराव केज तालुका प्रमुखपदी

# कार्य कर्तृत्वावर सोपविली जबाबदारी




बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

जिल्ह्यातील केज तालुका या ठिकाणी कार्यक्रमावेळी आशिष अशोक भालेराव यांची आजाद समाज पार्टी कांशीराम चे बीड जिल्हाध्यक्ष आशिषकुमार चव्हाण यांच्या हस्ते केज तालुका प्रमुख म्हणून निवड करण्यात आली या प्रसंगी आजाद समाज पार्टी कांशीराम च्या शाखेचेही अनावरण प्रमुख उपस्तित पाहुणे व पक्षाचे जिल्हाध्यक्ष आशिषकुमार चव्हाण यांच्या हस्ते करण्यात आले कार्क्रमाला प्रमुख उपस्तिती मधे आंबेडकरी चळवळीचे गाढे अभ्यासक तथा उत्तम व्याख्यान कार सिद्धार्थ शिनगारे हे ही होते तसेच पक्षाच्या जिल्हा कार्यकारणीचे प्रमुख पदाधिकारी ही उपस्तीत होते .कार्यक्रमा प्रसंगी आशिष भालेराव यांना केज तालुका प्रमुख पदाचे नियुक्ती पत्र देऊन आजाद समाज पार्टी कांशीराम बीड समस्त बहुजन समाजासाठी व तळागाळातील लोकांना न्याय मिळवून देण्या साठी राष्ट्रीय अध्यक्ष तथा भीम आर्मी चीफ खासदार भाई चंद्रशेखर आजाद यांच्या मार्गदर्शनाखाली बीड जिल्हा कार्यकारणी सदैव तयार असेल आजाद समाज पार्टी कांशीराम शिव,शाहू,फुले,आंबेडकर यांच्या विचारावर चालणारा पक्ष असून तो अन्याया विरुद्ध सदैव उभा राहणार असे प्रतिपादन जिल्हाध्यक्ष आशिषकुमार चव्हाण यांनी केले व पुढील कार्यासाठी भालेराव यांना शुभेच्छा दिल्या, तसेच या वेळी प्रमुख उपस्तिती असलेले पाहुने सिद्धार्थ शिनगारे सर यांनी उपस्तितांना मार्गदर्शन करते वेळी सांगितले की आंबेडकरी चळवळ ही रक्ताने नसून विचाराने सक्षम असते आजाद समाज पार्टीचा चा प्रत्येक कार्यकर्ता हा आंबेडकरी चळवळ सक्षम करण्यासाठी तो स्वतःहा ही सक्षम व्हायला हवा खासदार भाई चंद्रशेखर आजाद हे देशातील अन्यायाने पीडित दिन दलित समाजाला लोकांना न्याय मिळवून देण्याचे काम हे तेवढ्याच सक्षम पणे करत आहेत असे मौलिक मार्गदर्शन या वेळी त्यांनी केले.कार्यक्रमा प्रसंगी जिल्हा कार्यकारणीच्या पदाधिकाऱ्यांनीही भालेराव यांना मनोगत व्यक्त करून शुभेच्छा दिल्या, शुभेच्छा ना उत्तर देताना नवनियुक्त केज तालुका अध्यक्ष आशिष भालेराव यांनी आजाद समाज पार्टी केज तालुक्यातील प्रत्येक गावा गावात शेवटच्या माणसापर्यंत पोहोचवणार असे प्रतिपादन केले.या वेळी पक्षाचे जिल्हा उपाध्यक्ष शेख उस्मान, बीड तालुका अध्यक्ष अशोक(मायकल) वाघमारे,गेवराई तालुका अध्यक्ष सय्यद इनाम इनामदार,प्रवक्ता जावेद कुरेशी, ॲड.सदानंद वाघमारे, बीड तालुका उपाध्यक्ष रेहान शेख,माळेगाव ग्रामपंचायत चे संरपंच रुपसेन( बाप्पू) गव्हाणे,कापील जी मस्के,राहुल जी व्हाहुळे, अच्युत भालेराव,धनराज भालेराव,भारत भालेराव,महादेव चाळक ,करण भालेराव,अक्षय भालेराव, अजय भांगे,शेख साहेब,खतीब साहेब,तात्या दहातोंडे,बबिता नाईकवाडे, दैवशाला भालेराव,शिंदे मॅडम,आकाश भालेराव,सुरेश भालेराव,दयानंद भालेराव,चेतन मस्के आदी ग्रामस्थ उपस्तीत होते.

## दळणवळणाचा प्रश्न लागला मार्गी!

### दिलासा:नागद-बनोटी-फरदापुर राज्य मार्गाचे भूमिपूजन



नागद-बनोटी-फरदापुर या रस्स्त्याचे भूमिपूजन करतांना कन्नडचे आ.उदयसिंग राजपूत जिल्हाप्रमुख राजू राठोड व इतर

सोयगाव/पुण्यभूमी प्रतिनिधी

तीन महिने सरकार मध्ये राहिल्यावर अनेक संकटांना तोंड देऊन मतदार संघात विकास कामे केली आहे संकट काळी वेळप्रसंगी पायाही पडलो व विरोधकांच्या छातीवर कागदपत्रे ही फेकून मारली पण विकास च केला आहे असे मत उद्धव ठाकरे गटाचे कन्नड सोयगावचे आमदार उदय सिंग राजपूत यांनी सोमवारी बनोटी येथे केले यावेळी कन्नडचे आमदार उदयसिंग राजपूत जिल्हा प्रमुख राजू राठोड यांच्या हस्ते मराठवाडा खान्देश व विदर्भाला जोडणारा एकमेव राज्य मार्ग नागद-बनोटी-फरदापुर या ६० की मी रस्त्याचे सिमेंटकरण भूमिपूजन करण्यात आले राज्य रस्ते विकास महामंडळ अंतर्गत मराठवाडा-खान्देश व विदर्भ ला जोडणारा हा एकमेव राज्य मार्ग नागद -बनोटी-फरदापुर या राज्य मार्ग २४ चे नूतनीकरण साठी ३०८ कोटी रु निधी मंजूर केला असल्याचे कन्नड चे आमदार उदय सिंग राजपूत यांनी सांगितले यावेळी रस्त्याच्या कामाची प्रशासकीय मान्यता त्यांनी चक्क व्यासपीठावर दाखविली जिल्हा प्रमुख राजू राठोड यांनी सध्या इच्छुक असलेल्यानी मैदानात या व आम्हीही मैदानात येतो व उद्धव ठाकरे शिवसेनेच्या वतीने मतदार संघाच्या विकासासाठी किती निधी आणला हे जनतेला सांगावे असे आवाहन राजू राठोड यांनी केले यावेळी युवासेना तालुका प्रमुख स्वप्नील पाटील,तालुका प्रमुख दिलीप मचे,नवनाथ राठोड, अनिल करंगले,कल्याण चव्हाण,अनिल गाडेकर, अतिक शेख,नाना अहिरे, भगवान पालकर,सागर पाटील,गोरख पाटील,गौरव बिनदवाल,दीपक नगरे,शरद निकम,अतुल बोरसे,ज्ञानेश्वर युवरे,धरमसिंग सोळुंके,कैलास पवार,सदाशिव राठोड, दिलीप पदमे, आदींसह सरपंच,विभाग प्रमुख, उपविभाग प्रमुख, शाखाप्रमुख, आदींची उपस्थिती होती.



## शालेय विद्यार्थ्यांना आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण गरजेचे : मनोहर जगताप

**देवळाली कॅम्प :** येथील आदर्श अकॅडमी या इंग्लिश मिडीयम शाळेत शक्ती विकास संस्थेच्या वतीने संस्थेचे अध्यक्ष तथा आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षक मनोहर जगताप यांनी शाळेतील शिक्षक आणि विद्यार्थी यांना शाळेत अचानकपणे भूकंप, आग, किंवा इतर आपत्ती आल्यास या वेळी उपस्थित शिक्षक व विद्यार्थी आपत्कालीन स्थितीत मदतकार्य करून स्थिती पूर्ववत आणण्याकरिता प्रात्यक्षिक सादर केले. यांनी आपत्ती काळात बचाव करण्यासाठी विमोचन सेवा, रासायनिक अग्निशमन, हाड मोड तोड झाल्यास त्रिकोणी बँडेज चा वापर करून प्रथोमोपचार करणे आदी विषयावर प्रात्याक्षिके सहित मार्गदर्शन करत शालेय विद्यार्थ्यांना आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण गरजेचे असे मनोहर जगताप यांनी सांगितले.याप्रसंगी विद्यार्थ्यांना अचानक आलेल्या आपत्ती वर मात कशी करावी या विषयी मॉक ड्रिल सादर केले, यावेळी शाळेच्या मुख्याध्यापक उर्मिला शर्मा ,शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.

# परतीच्या पावसाने शेतकऱ्याचे नुकसान

## सर्वत्र सुरू असलेल्या कापणीनंतर भिजला पाण्यात मका

◆ **सटाणा (प्रतिनिधी):**

परतीच्या पावसाने कसमादेतील शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेला घास हिरावला असल्याने शेतकरी हातबल झाला आहे. या मोसमात कसमादे परिसरातील शेतकरी उन्हाळी कांद्यासाठी रोप तयार तयार करण्याच्या कामात व्यस्त असतात परंतु ठराविक अंतराने येणारे पावसामुळे या वर्षी कांदा जगवणे कठीण होऊन गेले आहे घरात होते नव्हते तेवढे बियाणे मातीत टाकून शेतकरी एक एका अर्थाने जुगार खेळलेला खरा परंतु या जुगारात निर्यातीने शेतकऱ्याचे स्वप्न धुळीस मिळवल्याने आज शेतकरी वर्ग नाराज व हताश होऊन पुन्हा एकदा कांदा बियाणं शोधण्यासाठी धडपडताना दिसत आहे. गुरुवार व शनिवारी रोजी सायंकाळी झालेल्या परतीच्या पावसाने विजेच्या कडाक्यासह दमदार पावसाने कापणी सुरू असलेल्या मक्याचे,



कांद्याचे व कांदा रोपाचे नुकसान केले आहे. कसमादेत अनेक शेतकऱ्यांनी काढून ठेवलेला मका शेतातच भिडला तर अनेक शेतकऱ्यांचा उभा असलेल्या मका देखील जमीन उद्ध्वस्त झाला. पतीच्या पावसाच्या थैमानामुळे कांदा रोपाची भाव गगनाला भिडले आहेत जुनी शेमळी येथील प्रितेश केदारनाथ बागुल अल्पभूधारक शेतकरी कांदा आणि मका या दोनच पिकांवर आपल्या उदरनिर्वाह करत असतो, यातही आसमानी आणि सुलतानी संकटांचा सामना करून घरात असलेला पैसा शेतात काळयामातीत ओतायचा आणि तिथून उत्पन्न मिळाले तर ठीक नाहीतर कर्जाचा बोजा डोक्यावर घ्यायचा अशी परिस्थिती झाली आहे. काल सायंकाळी झालेल्या पतीच्या पावसाने कापडी केलेला मका पूर्णता भिजल्यामुळे परिसरात अनेक शेतकऱ्यांचे नुकसान झाले. पतीच्या पावसाने कसमादे परिसरात झालेले नुकसानाचे पंचनामे करून शेतकऱ्यास मदत मिळावी अशी भावना शेतकऱ्यांकडून व्यक्त होत आहे. शेतीतून उत्पादन मिळाल्यावरच आमच्या कुटुंबाचा गाडा चालतो, पीक लावण्यापासून तर काडेपर्यंत अनेक संकटांचा सामना करावा लागतो, कालच्या पावसाने कापलेला संपूर्ण मका भिजला. झालेल्या नुकसानाची शासनाकडून मदत मिळावी. अशी मागणी प्रितेश बागुल या अल्पभूधारक शेतकरी ने केली आहे.



# 'ओतूर'चे श्रेय घेण्याचा केविलवाणा प्रयत्न

## आमदार नितीन पवार यांची विरोधकांवर टीका

◆ **कळवण (प्रतिनिधी) :**

ओतूर धरणाचे विरोधक श्रेय घेण्याचा केविलवाणा प्रयत्न करीत आहेत. विकासकामे कोण करतो हे जनतेला माहीत आहे. निवेदन देऊन, मोर्चे काढून विकासकामे होत नाही, अशा शब्दात आमदार नितीन पवार यांनी ओतूर धरणाच्या दुरुस्ती कामाच्या मंजुरीवरुन विरोधकांना खुले आव्हान दिले.

भूमिपूजन आमदार पवार व प्रगतशील शेतकरी पांडुरंग देवरे यांनी सपत्नीक केले. व्यासपीठावर जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा जयश्री पवार, नगराध्यक्ष कौतिक पगार, जेष्ठ नेते नारायण हिरे, देविदास पवार, बाजार समितीचे सभापती धनंजय पवार, अशोक पवार, काँग्रेस नेते यशवंत गवळी, उद्योजक संजय देवरे, राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष राजेंद्र भामरे, शिवस्मारकचे अध्यक्ष भूषण पगार, युवा नेते ऋषिकेश पवार, ओतूरच्या सरपंच पार्वता गांगुर्डे, काँग्रेस नेते महेंद्र हिरे, मोहन जाधव, शरद गुंजाळ, हेमंत पाटील, के. के. शिंदे, राजेंद्र पवार, संजय वाघ, साहेबराव पवार, विलास रौदळ, विजय जाधव व्यासपीठावर होते. आमदार पवार म्हणाले की, स्व. ए. टी. पवारांनी ओतूर धरणाचे स्वप्न पाहिले होते. ते साकार करण्यासाठी माझे प्रयत्न असून या धरणा संदर्भात झालेल्या बैठका, प्रशासकीय मान्यता, निविदा, मक्तेदार निश्चितीनंतर भूमिपूजन कार्यक्रम या प्रवासाचे सखोल विश्लेषण करत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या मार्गदर्शनाखाली शासनस्तरावर काय प्रयत्न केले याची जंत्रीच त्यांनी मांडली. पाच वर्ष लोकप्रतिनिधी असताना ओतूर धरणासाठी काय केले याचे उत्तर जनतेला द्या, असे आवाहन केले.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यामुळे तालुक्यातील प्रश्न मार्गी लागले, ओतूर धरणाला निधी मिळाला, मतदार संघात २२०० कोटी रुपयांचा विकासकामासाठी निधी आल्याचे सांगून पवार यांच्याप्रति आमदार पवार यांनी कृतज्ञता व्यक्त केली. सूत्रसंचालन राकेश हिरे यांनी केले. यावेळी कार्यकारी अभियंता मनोज ढोकचौळे, अशोक मोरे, कैलास देवरे, बळीराम देवरे, रवींद्र सोनवणे, अशोक देशमुख, नामदेव खैरनार, विठोबा बोरसे, शिवाजी सोनवणे, जिभाऊ देवरे, रविंद्र आहेर, दिगंबर पवार, शशी हिरे, उमेश वाघ, निबा देशमुख, उत्तम पवार, गंगाधर वाघ, दिपक सोनवणे, शांताराम मोरे, संदीप शिंदे, देवा भुजाडे, दिलीप शिंदे, मिथुन शिंदे, वाळू देवरे आदी उपस्थित होते.

## वेचक

### द्राक्ष बागायतदारांना ऑनलाईन नोंदणीचे आवाहन

**नाशिक:** युरोपियन युनियन व इतर देशांना द्राक्ष निर्यातीकरीता किड व रोगमक्त, उर्वरित अंश हमी देण्यासाठी राज्यात अपेडाच्या सहकार्याने ग्रेपनेट प्रणालीद्वारे निर्यातक्षम द्राक्ष बागांची नोंदणी करण्यात येते. त्या अनुषंगाने जास्तीत जास्त द्राक्ष बागायदार शेतकऱ्यांनी अपेडाच्या ग्रेपनेट या ऑनलाईन कार्यप्रणालीवर नोंदणी करावी, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी शिवाजी आमले यांनी केले आहे.
कृषी विभागामार्फत फळे व भाजीपाला निर्यातीस चालना देण्यासाठी विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. यासाठी जिल्हास्तरावर कृषी माल निर्यात मार्गदर्शन केंद्र स्थापन करण्यात आले आहे. तसेच द्राक्ष निर्यातीला चालना देण्यासाठी राज्यात निर्यातक्षम द्राक्ष बागांची नोंदणी, तपासणी, कीड व रोगमुक्त हमी, अॅगमार्क प्रमाणिकरण, फायटोसॅनिटरी प्रमाणीकरण या सर्व बाबींचे ग्रेपनेट प्रणालीद्वारे प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यात येत आहे. यासाठी अधिकाधिक द्राक्ष बागायदार शेतकऱ्यांनी नोंदणी करण्यासाठी कृषी सहायक, कृषी पर्यवेक्षक, मंडळ कृषी अधिकारी, तालुका कृषी अधिकारी यांच्याशी संपर्क साधावा, असेही आवाहन विभागीय कृषि सहसंचालक सुभाष काटकर, आमले यांनी केले आहे.

### पार्ट टाईम जॉबचे आमिष; १२ लाखांत ऑनलाइन गंडा

**नाशिक :** पार्ट टाईम जॉबचे आमिष दाखवून पैसे गुंतविण्यास भाग पाडले. या माध्यमातून एकाची ११ लाख ८५ हजारात ऑनलाइन फसवणूक करण्यात आली. सायबर पोलिस ठाण्यात या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आदित्य मदन भावसार रा. सातपूर कॉलनी यांनी फिर्याद नोंदविली. त्यांना ५७३५०७११९५४७ या अनोळखी व्हाटस्अप क्रमांकावरून तसेच टेलिग्रामवरून फिर्यादीस संपर्क साधून जास्तीत जास्त पगारात पार्ट टाइम जॉबचे आमिष दाखविले. त्यासाठी वेगवेगळ्या बँक अकाऊंटवरून पैसे गुंतविण्यास भाग पाडले. ऑल अमेझॉन पार्ट टाइम जॉब असे नाव असलेल्या व्हाटस्अप ग्रुपच्या माध्यमातून आदित्य यांच्याशी संपर्क साधण्यात आला. तसेच नंतर वेगवेगळ्या बँक अकाऊंटमध्ये पैसे देण्यास भाग पाडले. मात्र नोकरी तर मिळालीच नाही. अन् व्हाटस्अप ग्रुपही बंद पडला. त्यामुळे संशय अधिक बळावला. पैसे देऊनही नोकरी लागली नाही, त्यामुळे फसवणूक झाल्याचे लक्षात आले.

### विनोद राठोड यांची राज्य नाट्य स्पर्धेत हॅटट्रिक

**नाशिक :** महाराष्ट्र शासन सांस्कृतिक संचालनालयाच्या राज्य नाट्य स्पर्धेच्या अंतिम फेरीचा पारितोषिक वितरण समारंभ नुकताच मुंबईतील सावरकर स्मारक नाट्यगृहात पार पडला. नाशिकचे प्रसिद्ध प्रकाश योजनाकार विनोद राठोड यांना हिंदी राज्य नाट्य स्पर्धेसाठी 'बदलते करवटे' या नाटकाच्या उत्कृष्ट प्रकाश योजनेसाठी सन्मानित करण्यात आले. या नाटकाचे लेखक भगवान हिरे आणि दिग्दर्शक राम दौंड होते. समारंभात सांस्कृतिक मंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या उपस्थितीत ज्येष्ठ प्रकाश योजनाकार शीतल तळपदे, नाट्य निर्माता संघाचे अध्यक्ष संतोष काणेकर यांच्या हस्ते राठोड यांना पुरस्कार प्रदान करण्यात आला. राठोड यांनी यावर्षी चोरीला गेलाय (नाशिक केंद्र), आर्याम (मुंबई केंद्र), आणि बदलते करवटे (हिंदी स्पर्धा) या तिन्ही नाटकांसाठी प्रकाश योजनेचे पारितोषिक मिळवत हॅट्रिक साधली आहे. त्यांच्या या विजयामुळे सांस्कृतिक वर्तुळात त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

### अठरा महिन्याच्या चिमुकलीचा शोष खड्ड्यात बुडून मृत्यू

**देवळा :** मेशी ता देवळा येथील अवघ्या अठरा महिन्याची चिमुकली हेमांशी महेंद्र आहिरे हिचा दसऱ्याच्या दिवशी शनिवारी दि १२ रोजी दुपारी २ वाजता घरासमोरील असलेल्या शोष खड्ड्यातील पाण्यात बुडून दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना घडल्याने संपूर्ण गावांत हळहळ व्यक्त करण्यात येत आहे . याबाबत सविस्तर माहिती अशी की , मेशी ता देवळा येथे एन दसऱ्याच्या दिवशी शनिवारी दि १२ रोजी दुपारी २ वाजेच्या सुमारास हेमांशी महेंद्र आहिरे (१८ महिने) हिचा खेळतांना घरासमोरील पाण्याच्या टाकीत बुडून दुर्दैवी मृत्यू झाला.

# कोपरगावकरांनी केले तीन हजार खोटींच्या महिषासुराचे दहन

◆ **कोपरगाव (प्रतिनिधी):**

संजीवनी युवा प्रतिष्ठान आयोजित महिषासुर दहन उपक्रमात नागरीकांना भेडसावणाऱ्या समस्यांना वाचा फोडण्यात आली. तीन हजार खोटी असे नांव देण्यात आले होते. नागरिकांनी जल्लोष करत युवानेते विवेकभैय्या कोल्हे व दैवतांची व महापुरुषांची वेशभूषा केलेल्या बाल कलाकारांच्या हस्ते रेणुका कोल्हे यांच्यासह हजारो कोपरगावकरांच्या उपस्थितीत महिषासुर दहन पार पडले.

दरम्यान महिला सुरक्षा, कायदा सुव्यवस्था,खराब रस्ते,विजेची समस्या,पाणी, बेरोजगारीचा उसळलेला आगडोंब हा बाजारपेठ आणि नागरिकांच्या जीवनावर मोठा परिणाम करतो आहे.नेहमीच आपली संस्कृती जपण्याचे काम




संजीवनी युवा प्रतिष्ठान करत आले आहे.गेले अनेक वर्षापासून सर्वधर्मीय सामुदायिक विवाह सोहळे, पूरग्रस्तांना मदत,गंगाआरती, दहीहंडी, शिवजयंती उत्सव ,गडकिल्ले स्वच्छता मोहीम असे अनेक सामाजिक जाणीव जपणारे उपक्रम राबविले जातात.एम आय डी सी साठी संजीवनी युवा प्रतिष्ठानच्या माध्यमांतून हजारो सह्यांची मोहीम राबवून मंत्रालय स्तरावर पाठपुरावा केला त्यानंतर यश देखील मिळाले. अलीकडे रोजगार ही सर्वात मोठी समस्या असून त्यावर काम करणे गरजेचे आहे.

रस्त्यांची दुरावस्था, कायदा सुव्यवस्थेचा बोजवारा आणि नागरीकांना सुविधांची वानवा झाल्याने प्रचंड रोष नागरीकांना स्थानिक प्रश्नांनी होतो आहे. काही युवकांनी सर्वपित्री अमावस्येला तीन हजार कोटींचे पिंडदान केल्याचे आंदोलन नुकतेच घडले आहे. महिला भगिनींना सर्वात महत्वाचे काही असेल तर सुरक्षा मिळणे आवश्यक आहे.कोपरगांवमध्ये कायदा सुव्यवस्था अडचणीत आली असून राजकीय वरदहस्ताने व्यसनाधिनता आणि गुन्हेगारी वाढणे हे नव्या पिढीसाठी धोकादायक आहे.महिला भगिनी नवरात्री उत्सव मोठ्या आनंदाने साजरा करतात. संजीवनी बचत गटाने देखील तहसील मैदान येथे घेतलेला उपक्रम चांगला झाला.तुम्ही आमच्या पाठीशी असतात म्हणून आम्ही एवढे काम करू शकतो.सेवा हाच धर्म मानून सामाजिक जाणीव ठेवत काम करण्यासाठी युवा प्रतिष्ठान कटिबध्द आहे आणि पुढेही राहील असे विवेक कोल्हे म्हणाले. यावेळी पदाधिकारी, आजी माजी नगरसेवक, नागरिक, महिला भगिनी, संजीवनी युवा प्रतिष्ठानचे युवासेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# त्र्यंबकेश्वरला शीतला मातेचे पूजन संपन्न

◆ **त्र्यंबकेश्वर (प्रतिनिधी) :**

शारदीय नवरात्र निमित्ताने येथील गुरु गोरक्षनाथ आखाडा नवनाथ मंदिर येथे दुर्गाष्टमी नवमी पूजन झाले. शितला मातेचे महापूजन करून कन्या पूजन व कन्या भोजनाचा सोहळा संपन्न झाला. याच बरोबर टिकल्या,वही पेन या शालेय साहित्यांचे वाटप झाले.

या पिठाचे पिठोश्वर पिरगणेशनाथ महाराज यांच्या मार्गदर्शनानुसार सोहळा संपन्न झाला. योगी यशनाथ महाराज यांच्या हस्ते कन्या पूजन करण्यात आले. या विद्यार्थिनींचा आनंद द्विगुणीत झाल्याचे दिसून आले. विधिवत कन्या पूजन करून मिष्ठान् भोजन देण्यात आले. सुरवातीला या आखाड्याची इष्ट देवता गुरु गोरक्षनाथ मुर्ती पूजन झाले. कन्या पूजनाचे महत्त्व देवी भागवत ग्रंथात विशद केले आहे.आज काल महिला सक्षमीकरणावर भर दिला जात असला तरी स्त्रियांचा ,महिलांचा आदर करा ही शिकवण पुरातन काळापासूनची आहे. देवी स्वरूपात स्त्रियांचा आदर करायला हवा. इरा स्कूल त्र्यंबकेश्वर मधील विद्यार्थिनींना कन्या भोजन देण्यात आले. स्कूल मधील शिक्षिकानी या आखाड्यातील साधू महंतांना धन्यवाद देत आशीर्वाद घेतले.समाधान व्यक्त केले. यावेळी नाथ आखाड्यातील साधू उपस्थित होते. या आखाड्यात आपटेरुपी सोन्याचे तीन झाडे आहेत याचे देखील पूजन दसरा दिनी करण्यात आले.

# दिंडोरी येथे धान्य मार्केटचा शुभारंभ

◆ **दिंडोरी (प्रतिनिधी) :**

दिंडोरी येथील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या मुख्य बाजार आवार येथे विजयादशमीचे औचित्य साधून शनिवार, दि.१२ रोजी सकाळी दहा वाजता धान्य मार्केटचा शुभारंभ सभापती प्रशांत कड माजी उपसभापती कैलास मवाळ यांच्या हस्ते करण्यात आला असून शेतकरी बांधवांनी आपला शेतीमाल दिंडोरी येथील बाजार आवारात योग्य प्रकारे प्रतवारी करून विक्रीसाठी आणावा असे आवाहन सभापती प्रशांत कड सचिव जे.के. जाधव यांनी केले आहे.



यापसंगी संचालक गंगाधर निखाडे, पांडुरंग गडकरी, दत्तू भेरे, , दत्तात्रय शिंगाडे, व्यापारी अल्केश साबद्रा, संदीप पवार,सचिन पवार,माणिक पवार,सुरेश सोनवणे,रवींद्र देशमुख, वाडेकर सेठ कर्मचारी आर एस गणोरे प्रशांत जाधव विजय गागोड आदींसह शेतकरी उपस्थित होते.

# पंचवटीतील मालेगाव स्टॅण्ड येथे मध्यरात्री गोळीबार

◆ **पंचवटी (प्रतिनिधी) :**

पंचवटीतील मालेगाव स्टँन्ड पोलीस चौकीलगत बुधवारी(दि. ९) मध्यरात्री रामवाडीतील एका सराईतावर गोळीबार झाल्याचे समोर आले आहे. दरम्यान, वेळीच पळ काढल्याने तो बालंबाल बचावला असून सीसीटीव्ही फूटेज व परिसरात गोळीबाराचा आवाज झाल्याने ही घटना अखेर तीन दिवसांनी उघड झाली आहे. याबाबत पंचवटी पोलीसांत सातपूर येथील आरपीआयचे नगरसेवक प्रकाश लोंढे यांचे पुत्र भूषण लोंढेसह अन्य साथीदारांवर पंचवटी पोलिसांत आर्म अँक्टअन्वये गुन्हा नोंद झाला असून भूषण लोंढेचा शोध सुरु झाला आहे.

### तीन दिवसांनी आवाज आला?

गोळीबाराची गंभीर घटना घडून तीन दिवस पूर्ण झाले आहेत. तरी, पोलिसांकडून याबाबत कोणताही दुजोरा दिला जात नसल्याने आश्चर्य व्यक्त करण्यात येते आहे. तो झाला असतानाही तो दाबण्यासाठी अनेकांनी प्रयत्न केल्याचा आरोप स्थानिक नागरिकांनी केला आहे. कारण, अशी घटना घडूनही त्याचा तीन दिवस उलटल्यावर आवाज आला ? असा तिरकस प्रश्न स्थानिक उपस्थित करत आहेत.

बुधवारी मध्यरात्री एक वाजता सराईतांमधील आपापसातील भांडणातून हा गोळीबार झाला. त्यात भूषण लोंढेसह त्याचे तीन अनोळखी साथीदार उपस्थित होते, असे पोलिसांच्या एफआयआरमध्ये नमूद आहे. सराईत संशयित अजय बोरिसा याच्यावर हा गोळीबार झाल्याची प्राथमिक माहिती समोर येत असतानाच, त्याने व साथीदारांनी घटनास्थळावरुन पळ काढल्याने ते बचावले. तर, बोरिसा याने माझ्यावर गोळीबार झाला नसल्याचा दावा पोलिसांकडे केला आहे. त्यानुसार गुन्हेशाखा युनिट एकने परिसरातील सर्वच सीटीटीव्ही फूटेज ताब्यात घेऊन तपास सुरु केला आहे. पोलिसांच्या

### पोलीस अनिभिज्ञ : नगरसेवक पुत्रा विरुध्द गून्हा दाखल

माहितीनुसार, संशयित भूषण लोंढेसह त्याच्या साथीदारांचे बोरिसा व त्याच्या काही साथीदारांशी पूर्ववैमनस्य आहे. त्याचसंदर्भातील सेटलमेंट व समझोता करुन प्रकरणं मिटविण्यासाठी दोन्ही गटांची नियोजित भेट झाली. त्यात, समोरासमोर चर्चा सुरु असतानाच ती काहीतरी वादातून फिस्कटल्याने भूषण याने पिस्तूल वा गावठी कट्ट्यातून जमीनीवर दोन ते तीन राऊंड गोळीबार केल्याची माहिती समोर आली आहे.

# धान्याला विलंब होत असल्याने दुकानदार थेट प्रधान सचिवांच्या दारी

◆ **नाशिक (प्रतिनिधी) :**

सप्टेंबरचे धान्य ऑक्टोबर महिन्यात मिळाल्याची बाब राज्य रेशन व केरोसीन दुकानदार महामंडळाने थेट राज्याच्या अन्न व नागरी पुरवठा विभागाचे प्रधान सचिव देओल यांची भेट घेऊन निदर्शनास आणून दिली. तसेच इतरही अन्य मांगण्यावर यावेळी चर्चा केली. देओल यांनी सकारात्मक प्रतिसाद देत तत्काळ आदेश काढण्यात येतील, असे आश्वासन दिल्याचा दावा महामंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी केला आहे.

महामंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी गुरुवारी मंत्रालय गाठले. देओल यांची भेट घेऊन जिल्ह्यातील पुरवठा विभागाचा भोंगळ कारभारही उजेडात आणून दिला. सप्टेंबरचे धान्य थेट ऑक्टोबरमध्ये मिळाल्याने लाभार्थी धान्यापासून वंचित राहिल्याचे निदर्शनास आणून देताना या धान्यवाटपास मुदतवाढ देण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली.

कार्डधारक कमी झाल्याने कमिशन घातले आहे. कमिशन वाढवून देण्याची मागणीही यावेळी करण्यात आली. देओल यांनी पदाधिकाऱ्यांच्या समस्या ऐकून घेतल्या. त्यावर कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले. यावेळी प्रदेशाध्यक्ष सलीम पटेल, सरचिटणीस महेश सदावर्ते, सहसचिव अमोल पंडित, सरचिटणीस पराग आमले यांच्या निवेदनावर स्वाक्षऱ्या आहेत.

# वणी येथील दसऱ्याची ऐतिहासिक परंपरा कायम



**अभिलाषा गांगुर्डे**

**वणी :** येथे विजया दशमी उत्साहात साजरी, शंभर वर्षा पुर्वी पासुनची परंपरा कायम

वणी येथे विजया दशमी पारंपारिक पध्दतीने साजरा करण्यात आली.वणी गावची ग्रामदैवत जगदंबा मातेचा नवरात्रोत्सवाची सांगता विजया दशमी अर्थात दस-याला होते.दस-यांच्या पुर्व संध्येला जगदंबा माता मंदिरात विविध पुजा केल्या जातात तसेच शतचंडी यज्ञ ही केला गेला.विधीवत पुजा करून प्रतिकात्मक कोहळ्याचा बळी रात्री बारा वाजेला देण्यात आला. सकाळी जगदंबा माता मंदिरात दर्शना साठी ग्रामस्थांनी गर्दी केली. होती.दस-यांची दिवशी वणीत सिमोल्लंघन करण्याची परंपरा आहे. त्यानुसार दिलीप.१२ऑक्टो.२४रोजी सांयकाळी देवीची पालखी देशमुख वाड्यातुन काढण्यात आली. देवी मंदिरात पालखी सवाद्य मिरवत सिमोल्लंघना साठी कृषी उत्पन्न बाजार समिती पटांगणात हा कार्यक्रम करण्यात येतो.देवीची पालखी बरोबर शिंपी समाजाची पालखी सामिल होते .दोन्ही पालख्या ह्या सिमोल्लंघना च्या ठिकाणी आणण्यात आल्या.येथे आपट्याचे झाड उभे करण्यात आले होते.त्या ठिकाणी पुजा करून सोन लुटले गेले.तसेच प्रथे प्रमाणे बळी देण्याची प्रथा आहे ती आज ही कायम आहे या ठिकाणी प्रतिकात्मक कोहळ्याचा बळी देण्यात आला. पालखीचा मान दिलीप लक्ष्मण देशमुख व पंजाबराव देशमुख यांच्या कडे तर कोहळ्याचे तोडण्याचे दोन मानकरी आहेत प्रथम विक्रांत देशमुख यांनी कोहळयाचा प्रतिकात्मक बळी दिला तर दुसरा विवेक देशमुख यांनी दिला या वेळी येथे शहरातील सर्व स्तरावरील ग्रामस्थ हजर होते.

### १०० वर्षां पुर्वीची परंपरा आज ही वणीत कायम

गेल्या शंभर वर्षांपासूनचा विजयादशमी उत्सव साजरा करण्याची परंपरा जपलीआहे.ब्रिटिशकालीन राजवटीत संस्थान जहागिरी व इमाने प्राप्त देशमुख समाजाकडे गावातील रूढी, परंपरा, सण, उत्सव एकोप्याने साजरे करण्याची जबाबदारी होती. संपत आपाजीराव देशमुख हे त्या काळी लोकल बोर्डचे अध्यक्ष होते. ब्रिटिश सरकारकडून त्यांना समारंभ व उत्सवाचे निमंत्रण मिळाल्याने म्हैसूर व पश्चिम बंगालमध्ये विजयादशमी पर्वात रेड्याचा बळी दिल्याची प्रथा त्यांनी पाहिली. बळी दिल्यानंतर सुख-शांती, सुरक्षितता, रोगराई निर्मूलन, धनधान्य वाढ होते. अशी माहिती त्यांना देण्यात आल्याने त्यांनी १९२३ साली ही प्रथा वणी येथे सुरू केली.देवीची पालखीची मिरवणूक पालखी गावात मिरवली जात असे. यात मुस्लीम समाजाला सहभागी करून गोधडे या शिंपी समाजाचे मानाचे स्थान देऊन खंडेराव महाराजांची मूर्ती असलेली गावातील सर्व समाज बांधवांना बरोबर घेऊन जगदंबा देवी मंदिरात पोहचल्यानंतर सुवासिनी- कडून देवीला ओवाळून पूजा करण्यात येते. सिमोल्लंघन करण्यासाठी गावाच्या वेशीवर जाऊन रेड्याचे पूजन केले जायचे. चंद्रभान या शस्त्रने एकाच वारात शिरच्छेद करत केला जायचा. त्यानंतर रेड्याला वेशीवर पुरून द्यायचे आपट्याची पाने लुटून सीमोल्लंघन करण्यात येई.
या दरम्यान गाडगे महाराज व त्यांचे शिष्य अवघडानंद यांचे वणीत आगमन झाले. संपतराव देशमुख यांना पुत्र प्राप्तीसाठी सांगितले की, तुम्ही ही प्रथा बंद करून कोहळ्याचा प्रतीकात्मक पद्धतीने शिरच्छेद करा. हा आदेश देशमुख समाजाने मानला. संपतरावांना पुत्रप्राप्ती झाली व तेव्हा पासून विजया- दशमीला कोहळ्याच्या बळीची प्रथा सुरू झाली. आजही संपूर्ण देशमुख समाज गावातील सर्व समाज बांधवांना एकत्रित करून विजयादशमी आनंदाने साजरी करता.

# दऱ्हाणे येथे वीज पडून झोपडी खाक

◆ **सटाणा (प्रतिनिधी) :**

बागलाण तालुक्यातील द-हाणे येथे काल रात्री झालेल्या मुसळधार पावसामध्ये वीज पडून एक आदिवासी कुटुंबाची झोपडी वजा घर जळून खाक झाले असून संपूर्ण संसार उध्वस्त झाला आहे.

याबाबत सविस्तर वृत्त असे की संपूर्ण महाराष्ट्रात परतीच्या पावसाने धुमाकूळ घातला असून यात शेती पिकांसह मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे, विजाच्या कडकडाटासह मुसळधार पाऊस बरसत आहे. असाच काल शनिवार दिनांक 12 ऑक्टोबर रोजी रात्री अकरा वाजता बागलाण तालुक्यातील द-हाने येथे विजांच्या कडकडाटासह मुसळधार पाऊस सुरू झाला. येथील बापू मांगू गांगुर्डे हे आदिवासी कुटुंब झोपडी वजा घरात राहतात. या झोपडी वजा घरात बापू गांगुर्डे यांचा एकूण आठ जणांचा परिवार राहतो. विजांच्या कडकडाटासह अचानक जोरदार पाऊस सुरू झाला यात एक वीज बापू गांगुर्डे यांच्या घराजवळ पडली असता संपूर्ण झोपडीने पेट घेतला, संपूर्ण झोपडी उसाच्या पाचटापासून व त्यावर प्लास्टिकचे आवरण देऊन तयार केली होती, प्लास्टिकचे आवरण असल्यामुळे काही क्षणात आगीने रौद्र रूप धारण केले. झोपडी वजा घराला आग लागल्याचे लक्ष देताच घरातील रंजनाबाई यांनी त्यांचे पती बापू गांगुर्डे यांना उठविले व प्रसंगावधान राखत घरातील सर्व लहान मोठे असे आठ जणांना सुरक्षित बाहेर काढले व गावात मदतीसाठी आरडा ओरड केली.

आरडा ओरड एकूण गावातील बहुतेक जण मदतीसाठी धावले परंतु तोपर्यंत आगीने रौद्र रूप धारण केल्यामुळे कुणालाही घरामध्ये जाता येत नव्हते, गावातील सामाजिक कार्यकर्ते आबा महाले यांनी सटाणा अग्निशमन कार्यालयात फोन करून मदतीची मागणी केली, अग्निशमक पथकाने देखील परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन घटनास्थळी दाखल झाले परंतु तोपर्यंत संपूर्ण संसार जळून खाक झाला होता. साधारण एक ते दोन तासाच्या अथक प्रयत्नाने आग आटोक्यात आणली. सुदैवाने आजूबाजूच्या घरांच्या पक्क्या भिंती असल्यामुळे आग मर्यादित राहिली नाही तर संपूर्ण आदिवासी वस्ती या आगीत सापडली असती. या झोपडी वजा घरात एकूण आठ जणांचे कुटुंब राहत होते यात कुणालाही गंभीर स्वरूपाची दुखापत झाली नसून मात्र संसार उपयोगी वस्तू जळून खाक झाले आहेत यात सर्व प्रकारचे अन्नधान्य,दूरदर्शन संच, दोन मोबाईल तसेच ऊस तोडणी कामगार म्हणून ठेकेदाराकडून उचल म्हणून घेतलेली ७० हजाराची रोकड यात जळून खाक झाली असून आज या परिवाराचा जीवन मरणाचा प्रश्न निर्माण झाला आहे.

यावेळी द-हाणे येथील सरपंच आशाबाई रणजित ठाकरे, माजी सरपंच संगीताबाई आनंदसिंग ठोके, उपसरपंच दादाभाऊ ठोके, सदस्य शंकर ठोके, रवींद्र माळवे यांनी बापू गांगुर्डे यांना लागलीच आर्थिक मदत करून द-हाणे गावातील ग्रामस्थांना मदतीचे आवाहन केले, यावेळी ग्रामसेवक सुभाष निकम यांनी तात्काळ पंचनामा करून सर्व शासकीय सोपस्कार पूर्ण केले.

तरी या आदिवासी परिवाराचे आगीत झालेले नुकसान बघता बागलाण तालुक्यातील दानशूर व्यक्तींनी या परिवाराला पुन्हा संसार उभा करण्यासाठी आपल्या यथाशक्ती नुसार मदत करावी असे आव्हान करण्यात आले आहे.



# पाकचा कसोटी इतिहासातील सर्वात लाजिरवाणा पराभव!

## इंग्लंडने पहिला कसोटी सामना एक डाव, ४७ धावांनी जिंकला

**मुलतानः** पाकिस्तान आणि इंग्लंड यांच्यातील कसोटी मालिकेतील पहिल्या सामन्यात पाकिस्तानला इतिहासातील सर्वात लाजिरवाणा पराभव स्वीकारावा लागला. इंग्लंडने आज शुक्रवारी पाकिस्तानचा एक डाव आणि ४७ धावांनी पराभव केला. कसोटी क्रिकेटच्या १४७ वर्षांच्या इतिहासात पाकिस्तानचा हा सर्वात मोठा पराभव आहे. पहिल्या डावात ५५६ धावा केल्यानंतर एक डाव आणि धावांच्या फरकाने पराभूत होण्याची पाकिस्तानची ही पहिलीच वेळ आहे.

मुलतान कसोटीच्या पहिल्या डावात इंग्लिश फलंदाजांनी यजमान पाकिस्तानच्या गोलंदाजांची धुलाई केली होती. प्रथम फलंदाजी करताना पाकने त्यांच्या पहिल्या डावात ५५६ धावा केल्या होत्या. प्रत्युत्तरात पाहुण्या इंग्लंडने ७ गडी गमावून ८२३ धावांचा डोंगर रचला. मात्र, पाकचा दुसरा डाव २२० धावांवर गडगडला. दुसऱ्या डावात इंग्लंडच्या गोलंदाजांनी पूर्णपणे वर्चस्व राखले. कसोटी क्रिकेटमधील पाकिस्तानचा हा सलग सहावा पराभव आहे. तर गेल्या ९ कसोटी सामन्यात पाकिस्तानचा हा सातवा पराभव आहे.

# बीसीसीआयने देशांतर्गत क्रिकेट स्पर्धेतील नियमांमध्ये केले बदल

देशोन्नती वृत्तसंकलन

**नवी दिल्लीः** भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (बीसीसीआय) आजपासून सुरू झालेल्या रणजी ट्रॉफीसह देशांतर्गत सामन्यांच्या नियमांमध्ये बदल केले आहेत. हे नियम खेळाच्या विविध परिस्थीतीमध्ये लागू होतात, ज्यामध्ये मध्येच डाव सोडणे, चेंडूशी छेडछाड, चौकार स्कोअरिंग आणि कर्नल सीके नायडू ट्रॉफीमध्ये गुण वाटप यांचा समावेश होतो. सर्वात महत्त्वाचे म्हणजे डावाच्या मध्यात फलंदाजांना आता रिटायर्ड हर्ड होऊन परतता येणार नाही. दुखापत, आजार किंवा अपरिहार्य परिस्थितींव्यतिरिक्त इतर कारणांमुळे निवृत्त झालेल्या कोणत्याही फलंदाजाला ताबडतोब बाद केले जाईल.




### चेंडूला थुंकी लावणाऱ्या खेळाडूवर कडक कारवाई

बॉल टॅम्परिंगला आळा घालण्यासाठी बीसीसीआयने कडक नियम लागू केला आहे. चेंडूवर थुंकी लावल्यास चेंडू बदलणे अनिवार्य केले आहे. याव्यतिरिक्त, नियम उल्लंघनासाठी जबाबदार असलेल्या संघाला दंड आकारला जाईल. जर ओव्हर थ्रो केलेला चेंडू चौकार गेला तर चार अतिरिक्त धावा मिळतील; परंतु खेळाडूंनी धावून काढलेल्या धावा मोजल्या जाणार नाहीत.

# आता पंच करणार पाकिस्तान संघाची निवड

वृत्तसंस्था

### इंग्लंडकडून झालेल्या पराभवानंतर घोषणा

**कराची :** इंग्लंडने पाकिस्तानचा पहिल्याच कसोटी सामन्यात दारूण पराभव केला. एक डाव आणि ४७ धावांनी पाकिस्तानला पराभवाचे तोंड पाहावे लागले. सामन्याच्या सुरुवातीला नाणेफेकीचा कौलही पाकिस्तानच्या बाजूने लागला होता. इतकंच काय तर मनासारखी पहिल्यांदा फलंदाजी करण्याची संधीदेखील मिळाली, पण सर्वकाही उलट फिरले आणि इंग्लंडने पाकिस्तानला एक डाव आणि ४७ धावांनी पराभूत केले. पाकिस्तान क्रिकेट टिमसाठी नव्या निवड समितीची घोषणा केली आहे. या निवड समितीत एका पंचाचादेखील सहभाग केला आहे. वनडे वर्ल्डकप २०२३ पासून पाकिस्तान क्रिकेट संघात राजीनामा सत्र सुरू आहे. नुकतेच मोहम्मद युसुफने निवड समिती




सोडण्याचा निर्णय घेतला. इंग्लंडकडून मिळालेल्या पराभवानंतर निवड समितीत काही बदल करण्यात आले आहेत. नव्या निवड समितीत अलीम दार, आकिब जावेद, असद शफीक, अझहर अली आणि हसन चीमा यांची निवड केली आहे. असम शफीक आणि हसन चीमा यापूर्वी निवड समितीत होते. आता अलीम दार, आकिब जावेद आणि अझहर अली यांना सहभागी केलं आहे.

# पाकिस्तान वर्ल्ड चॅम्पियनशिप फायनलच्या शर्यतीतून बाहेर

वृत्तसंस्था

**मुलतानः** पाकिस्तान क्रिकेट संघाला घरच्या मैदानावर अजून एक लाजिरवाण्या पराभवाला सामोरे जावे लागले आहे. पाकिस्तानी संघ इंग्लंडविरुद्धच्या तीन कसोटी सामन्यांच्या मालिकेतील पहिल्याच सामन्यात पराभूत झाला आहे. पाकिस्तानने पहिल्या डावात फलंदाजी करताना ५५० हून अधिक धावा केल्या होत्या, मात्र त्यानंतरही संघाला एका डावाने मोठा पराभव पत्करावा लागला आहे. वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप अंतर्गत ही मालिका खेळवली जात आहे. हा सामना गमावल्यानंतर पाकिस्तानी संघ आता वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपच्या अंतिम फेरीच्या



शर्यतीतून जवळपास बाहेर पडला आहे. या विजयाचा फायदा इंग्लंडला झाला आहे. इंग्लंडने पाकिस्तानवर विजय मिळवल्यानंतर जागतिक कसोटी चॅम्पियनशिपच्या गुणतालिकेत मोठा बदल झाला आहे. मात्र, याचा टिम इंडियाच्या स्थानावर कोणताही परिणाम झालेला नाही. भारतीय संघ अजूनही पहिल्या क्रमांकावर आहे. तर पाकिस्तानच्या संघाला सहाव्या कसोटी पराभवानंतर थेट तळाचे स्थान मिळाले आहे.

# टिम इंडियाच्या टी20 संघात 'या' तिघांना दार बंद!

देशोन्नती वृत्तसंकलन

**मुंबई** :बांगलादेशविरुद्धच्या तीन सामन्यांच्या टी२० मालिकेत सूर्यकुमार यादवच्या नेतृत्वात भारतीय संघाने जबरदस्त कामगिरी केली आहे. तीन सामन्यांच्या टी२० मालिकेत २-० ने आघाडी घेतली आहे. सूर्यकुमार यादव काही नव्या चेहऱ्यांसह मैदानात उतरला आहे. तरीही भारताने या संघात नितीश रेड्डी आणि मंयक यादव यांच्यासारखे नवे चेहरे आहेत. नवोदित खेळाडूंच्या कामगिरी पाहता भविष्यात त्यांचे संघातील स्थान निश्चित असल्याचे दिसत आहे. त्यामुळे काही प्रमुख खेळाडूंचा टी२० संघातून

### शार्दुल ठाकूर, श्रेयस अय्यर आणि केएल राहुल यांचा समावेश



पत्ता कापला जाऊ शकतो, असे क्रीडारसिकांचे म्हणणे आहे.

शार्दुल ठाकूर- वेगवान गोलंदाज आणि वेळेप्रसंगी फलंदाजी करणाऱ्या शार्दुल ठाकूरचे टी२० संघाचे दरवाजे जवळपास बंद झाले आहेत, कारण गेल्या अडीच वर्षांपासून तो टी२० संघाचा भाग नाही. फेब्रुवारी २०२२ मध्ये वेस्ट इंडिजविरुद्ध शेवटचा टी२० सामना खेळला होता.

श्रेयस अय्यर- श्रेयस टिम इंडियात स्थान मिळवण्यासाठी झगडत आहे. देशांतर्गत क्रिकेटमध्येही त्याची हवी तशी छाप पडलेली नाही. तसेच टी२० क्रिकेटमध्ये त्याचा स्ट्राईक रेट कायमच चर्चेचा विषय राहिला आहे.

केएल राहुल - केएल राहुललाही टी२० संघात स्थान मिळताना दिसत नाही. आयपीएलमध्येही त्याच्या फलंदाजीची हवी तशी छाप पडली नाही. त्यामुळे टी२० वर्ल्डकप संघात निवड झाली नाही. त्यामुळे केएल राहुलने कसोटी आणि वनडे क्रिकेटवर लक्ष केंद्रीत केल्याचे दिसत आहे.

## शाहीन आफ्रिदीने बाबरला 'झिम्बू' म्हणून हिणवले!



### व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल

**मुलतानः** पाकिस्तानचे क्रिकेट संघाचे फॅन्स आणि त्यांचे व्हिडिओ सोशल मीडियावर कायम चर्चेचे विषय ठरतात. आता असाच एक व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. आता एका पाकिस्तानी क्रिकेट फॅनने सोशल मीडियावर व्हिडिओ पोस्ट केला आहे. या व्हिडिओत वेगवान गोलंदाज शाहीन आफ्रिदी बाबर आझमला झिम्बू म्हणून हाक मारत असल्याचे सांगण्यात आले आहे. मुलतान कसोटीतील हा व्हिडिओ असल्याचे सांगण्यात येत आहे.

### भारतीय क्रिकेट संघ मालिकेत २-० ने आघाडीवर

# आज हैदराबाद येथे इंडिया-बांगलादेश यांच्यात अंतिम सामना



वृत्तसंस्था

हैदराबादःभारतीय क्रिकेट संघ बांगलादेश विरूद्धच्या टी २० आय मालिकेत २-० ने आघाडीवर आहे. तर आता टीम इंडियाच्या युवा ब्रिगेडचे लक्ष हे बांगलादेशला ३-० ने क्लिन स्वीप देण्याकडे असणार आहे.

इंडिया-बांगलादेश यांच्यातील तिसरा आणि अंतिम सामना उद्या शनिवारी १२ ऑक्टोबर रोजी हैदराबादमधील राजीव गांधी आंतरराष्ट्रीय स्टेडियममध्ये खेळवण्यात येणार आहे. टीम इंडियाने पहिल्या दोन्ही सामन्यात धमाकेदार विजय मिळवला. तर आता टीम इंडियाने तिसऱ्या सामन्यासाठी जोरदार तयारी केली आहे. तर दुसऱ्या बाजूला बांगलादेशचा हा सामना जिंकून भारत दौऱ्याचा शेवट विजयाने करण्यासाठी प्रयत्नशील असणार आहे. अशात या सामन्यात कोण यशस्वी ठरते? याकडे साऱ्यांचे लक्ष असणार आहे.



**हैदराबादः** भारताचा क्रिकेटपटू मोहम्मद सिराजने शुक्रवारी तेलंगणाचे पोलीस महासंचालक (डीजीपी) यांना अहवाल दिल्यानंतर अधिकृतपणे पोलीस उपअधीक्षक (डीएसपी) म्हणून पदभार स्वीकारला. यावेळी मोहम्मद सिराजसोबत खासदार एम. अनिल कुमार यादव, खासदार आणि TGMREIS चे अध्यक्ष मोहम्मद फहीमुद्दीन कुरेशी उपस्थित होते.

# कसोटी मालिका अजून संपलेली नाही

वृत्तसंस्था

### कर्णधार शान मसूदचे मत

**मुलतान** :'कसोटी मालिका अजून संपलेली नाही. आम्ही सीरिजच्या मध्यात आहोत. आम्ही आमच्या संघाच्या मानसिकतेचा विचार करत आहोत. कसोटी क्रिकेट हे एक अत्युच्च दर्जाचे क्रिकेट आहे. या क्रिकेटमध्ये संघाला चांगला मार्ग शोधण्यासाठी पुन्हा संधी मिळते. फक्त खेळाडूंनी हे लक्षात ठेवायला हवे की कसोटी क्रिकेटमध्ये धावा करणे आणि विकेट्स घेणे या दोन गोष्टी अपरिहार्य आहेत,' असे सूचक विधान पाकिस्तानचा कर्णधार शान मसूदने केले. 'आम्हाला क्रिकेट खेळायला आवडते, सामन्याच्या निकालामुळे काही वेळा वाईट वाटते, काही वेळ निकाल पाहून देश म्हणूनही वाईट वाटते, पण त्या सगळ्यातून बाहेर येण्याची ताकददेखील हा खेळच देतो. पाकिस्तान क्रिकेट आम्हाला सर्वतोपरी सहकार्य करत आहे, पण त्यांना अपेक्षित विजयी निकाल आम्ही देऊ शकत नाही त्यामुळे आम्हाला आता लवकरात लवकर एक समतोल खेळाडूंचा गट म्हणून पुन्हा संघबांधणी करावी लागेल.

# पदक विजेत्या मनू भाकरचा रॅम्प वॉक

**नवी दिल्ली** :ऑलिम्पिक चॅम्पियन मनू भाकरने नुकतेच एका फॅशन शोमध्ये रॅम्प वॉक केले आणि तिचा व्हिडिओ व्हायरल झाला आहे. भाकरने २०२४ पॅरिस ऑलिम्पिकमध्ये महिलांच्या १०-मीटर एअर पिस्तूल आणि १०-मीटर एअर पिस्तूल मिश्र प्रकारात कांस्यपदक मिळवून ऑलिम्पिकच्या एकाच आवृत्तीत दोन पदके जिंकणारी पहिली भारतीय ॲथलीट बनून इतिहास रचला. मनू भाकर रॅम्प वॉक करतानाचा व्हिडिओ व्हायरल झाला आहे. ज्यामध्ये असंख्य प्रेक्षकांच्या उपस्थितीमध्ये मनू भाकर फॅशनेबल

### व्हिडिओ व्हायरल

कपडे परिधान करून रॅम्प वॉक करताना पाहायला मिळत आहे. मनूच्या या रॅम्प वॉकला प्रेक्षकांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे..मनू भाकर एक यशस्वी नेमबाजी आहे, तिने आयएसएसएफ जागतिक नेमबाजी चॅम्पियनशिप, आयएसएसएफ वर्ल्ड कप, आशियाई चॅम्पियनशिप आणि कॉमनवेल्थ गेम्समध्ये अनेक पदके जिंकली आहेत. तिने २०२२ आशियाई खेळ आणि २०१८ च्या राष्ट्रकुल स्पर्धेत सुवर्णपदक जिंकले आहे.



# गौतम अदानींचा नवा विक्रम!

देशोन्नती वृत्तसंकलन

**नवी दिल्लीः** फोर्ब्सने जगातील सर्वात श्रीमंत लोकांची यादी जाहीर केली आहे. यामध्ये रिलायन्स इंडस्ट्रीजचे अध्यक्ष मुकेश अंबानी हे ११६ अब्ज डॉलर्सच्या संपत्तीसह जगातील सर्वात श्रीमंत व्यक्तींच्या यादीत ९ व्या क्रमांकावर आहेत. तर भारतातील ते सर्वात श्रीमंत व्यक्ती आहेत. तर गौतम अदानी हे भारतातील दुसरे सर्वात श्रीमंत उद्योगपती आहेत. ज्यांची एकूण संपत्ती ८४ अब्ज डॉलर आहे; परंतु, गेल्या पाच वर्षात अदानी यांच्या संपत्तीत सर्वात वेगाने वाढ झाली आहे. अदानी समूहाचे अध्यक्ष गौतम अदानी यांच्या संपत्तीत गेल्या पाच वर्षांत ८६५ टक्क्यांची

गौतम अदानी हे भारतातील दुसरे सर्वात श्रीमंत उद्योगपती आहेत. ज्यांची एकूण संपत्ती ८४ अब्ज डॉलर आहे; परंतु, गेल्या पाच वर्षात अदानी यांच्या संपत्तीत सर्वात वेगाने वाढ झाली आहे. अदानी समूहाचे अध्यक्ष गौतम अदानी यांच्या संपत्तीत गेल्या पाच वर्षांत ८६५ टक्क्यांची वाढ झाली आहे.

### मुकेश अंबानी यांच्या संपत्तीत ६६ अब्ज डॉलरची वाढ

फोर्ब्सने रिअल-टाइम अब्जाधीशांच्या क्रमवारीनुसार जगातील सर्वात श्रीमंत व्यक्तींची यादी जाहीर केली आहे. या यादीनुसार, मुकेश अंबानी यांच्याकडे ११६ अब्ज डॉलर्सची संपत्ती असून २०१९ ते २०२४ दरम्यान त्यांची संपत्ती १३२ टक्क्यांची वाढ झाली आहे. २०१९ मध्ये मुकेश अंबानी यांची एकूण संपत्ती ५० अब्ज डॉलर होती, जी २०२४ मध्ये ११६ अब्ज डॉलर झाली आहे.

### जगातील श्रीमंतांची यादी जाहीर



वाढ झाली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, गेल्या पाच वर्षात गौतम यांच्या संपत्तीत मुकेश अंबानी यांच्या संपत्तीपेक्षा अधिक वेगाने वाढ झाली आहे.




# रोहित शर्मा आयपीएल 2025 च्या मेगा लिलावात उतरणार

**मुंबईः** आयपीएल मेगा ऑक्शन २०२५ ची वेळ जसजशी जवळ येत आहे, तसतसे रोहित शर्माचे भविष्य हा चर्चेचा विषय बनला आहे. आपला माजी कर्णधार रोहितला संघात कायम ठेवायचे की त्याला लिलावासाठी सोडायचे, हा निर्णय मुंबई इंडियन्ससाठी खूप महत्त्वाचा असेल. गेल्या मोसमात मुंबई इंडियन्सने गुजरात टायटन्सकडून संघात पुनरागमन केलेल्या रोहितच्या जागी हार्दिक पांड्याकडे कर्णधारपद सोपवले होते. मुंबई इंडियन्सचा माजी खेळाडू हरभजनसिंगने आता रोहितच्या आयपीएल कारकिर्दीबद्दल काहीतरी मोठे बोलले आहे.

रोहित शर्माचा जुना सहकारी आणि माजी भारतीय खेळाडू हरभजनसिंगचा विश्वास आहे की, रोहितला कायम न ठेवल्यास आयपीएल लिलावात त्याच्यावर मोठी बोली लावली जाऊ शकते.

# आणखी एक पाकिस्तानी क्रिकेटर भारतीय मुलीशी करणार लग्न

वृत्तसंस्था...



**कराचीः** सानिया मिर्झाशी घटस्फोट घेतल्यानंतर शोएबने पाकिस्तानी वंशाची अभिनेत्री आयशा उमरसोबत दुसरे लग्न केले आहे. तर दुसरीकडे आता आणखी एक पाकिस्तानी क्रिकेटर राजा हसन भारतीय वंशाच्या मुलीच्या प्रेमात पडला आहे. हसनने त्याच्या अधिकृत इन्स्टाग्राम अकाउंटवरून ही माहिती दिली आहे. पूजा बोमन असे भारतीय वंशाच्या मुलीचे नाव आहे. हसन लवकरच या मुलीसोबत लग्नगाठ बांधणार आहे. दरम्यान, या जोडप्याने आधीच लग्न केल्याचे सांगितले जात आहे. मीडिया रिपोर्ट्सनुसार, पूजाला इस्लाममध्ये खूप रस आहे आणि असे बोलले जात आहे की, हसनशी लग्न करण्यापूर्वी ती हिंदू धर्म सोडून इस्लामचा स्वीकार करू शकते.

# सेन्सेक्स- निफ्टी 'रेड झोन'मध्ये बंद

देशोन्नती वृत्तसंकलन

### बँकिंग, ऑटो शेअर्समध्ये घसरण

**मुंबईः** परदेशी गुंतवणूकदारांचा विक्रीकडे राहिलेला कल, कमकुवत दुसऱ्या तिमाहीतील कमाईचे अंदाज तसेच वाढत्या भू-राजकीय तणावाच्या पार्श्वभूमीवर आज शुक्रवारी (दि.११) दिवसभर भारतीय शेअर बाजारात चढ-उतार दिसून आला. सेन्सेक्स २३० अंकांनी घसरून ८१,३८१ बंद झाला. तर निफ्टी ३४ अंकांच्या किरकोळ घसरणीसह २४,९६४ वर स्थिरावला. विशेषतः आज बँकिंग, ऑटो शेअर्समध्ये घसरण झाली.

सेन्सेक्सवर टीसीएस, एम अँड एम, आयसीआयसीआय बँक, मारुती, पॉवर ग्रिड, ॲक्सिस बँक हे शेअर्स घसरले. तर एचसीएल टेक, टेक महिंद्रा, जेएसडब्ल्यू स्टील, हिंदुस्तान युनिलिव्हर हे शेअर्स वधारून बंद झाले.

# पुणेकर ऋतुराज पडलाय मागे

### माजी निवडकर्त्याने दिली मुंबईकराला पसंती

देशोन्नती वृत्तसंकलन

**मुंबईः** कसोटी सामन्यात रोहित शर्मा आणि यशस्वी जैस्वाल ही जोडी भारतीय संघाच्या डावाची सुरुवात करणार हे अगदी स्पष्ट आहे, पण ऑस्ट्रेलिया दौऱ्यात रोहित शर्मा काही सामन्याला मुकणार असल्याचे समोर येत आहे. आधीपासूनच या दौऱ्यावर भारतीय संघ अतिरिक्त सलामीवीरासह संघ बांधणी करेल, अशी चर्चा रंगत होती. ऑस्ट्रेलिया दौऱ्यातील बॉर्डर गावसकर ट्रॉफीसाठीच्या ५ सामन्यांच्या कसोटी मालिकेत अभिमन्यू ईश्वरन, ऋतुराज गायकवाड आणि साई सुदर्शन यापैकी एकाला संधी मिळेल, अशी चर्चा रंगत आहे. या शर्यतीत पुणेकर ऋतुराज थोडा मागेच पडल्याचे दिसत असताना आता या शर्यतीत मुंबईकर पृथ्वी शॉच्या नावाचा समावेश झाला आहे.

# स्वारातीचे डॉक्टर नोटा कमावण्यात व्यस्त?

**बोंबला** | अनेक डॉक्टर करताहेत राजरोसपणे खाजगी प्रॅक्टिस

अजय वाघमारे/ अंबाजोगाई

रुग्णाला जीवनदान देणाऱ्या डॉक्टरांना समाजाकडून देवाचा दर्जा दिला जातो आणि डॉक्टरांनी सुध्दा रुग्णांची निर्व्याज सेवा करण्याची शपथ घेतलेली असते.आपल्या अंबाजोगाई येथील स्वामी रामानंद तीर्थ शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व ग्रामीण रुग्णालय येथे ज्यांना खासगी रूग्णालयात उपचार घेण्याची कुवत नाही असे हजारो रुग्ण विविध जिल्ह्यातून येत असतात.सरकारने रुग्णांची गैरसोय होऊ नये म्हणून किंवा एखाद्या रुग्ण पैशा अभावी दगावू नये म्हणून डॉक्टरांना खासगी प्रॅक्टिसवर बंदी घातली आहे.मात्र स्वाराती रुग्णालयातील गायनिक , ऑर्थो , सर्जरी , मेडिसिन , इ एन टी चे तज्ज्ञ सिनियर डॉक्टरांनी या शासन निर्णयाला केराची टोपली दाखवून राजरोसपणे शहरात आलिशान हॉस्पिटल बांधून रुग्णांना लुटण्याचे काम करत आहेत.ज्या डॉक्टरांनी निर्व्याज सेवा देण्याची शपथ घेऊन प्रशासकीय सेवेत राहू असे प्रतिज्ञापत्रावर लेखी घेतले असताना त्याचा विसर येथील डॉक्टरांना होताना दिसत आहे. हे डॉक्टर गलेलठ्ठ पगार घेऊन बेसिक वेतनाच्या ३५ टक्के व्यवसायरोध भत्ता घेऊन सुध्दा ' लक्ष्मी ' प्राप्त करण्यासाठी ' सरस्वती ' शी प्रतारणा करण्यात मग्न झाले आहेत. अनेक डॉक्टरांनी आपल्या पत्नीच्या नावे हॉस्पिटलची नोंद केलेली आहे. मुळात स्वाराती रुग्णालयात येणाऱ्या प्रत्येक रुग्णावर व्यवस्थित उपचार करणे हे डॉक्टरांचे आद्य कर्तव्य आहे.मात्र काही डॉक्टर यामध्ये कामचुकारपणा व हलगर्जीपणा करताना दिसून येत आहेत.राऊंड घेतला की ड्युटी झाली

पान २ वर...




या बद्दल वारंवार तक्रार करूनही या डॉक्टरांवर कारवाही होत नाही. त्यामुळे आता मुंबई येथे डीएमईआर आयुक्त राजीव निवतकर यांना प्रत्यक्ष भेटून पुरावे सादर करणार आहे.
तक्रारदार



डॉक्टरांनी ड्युटी केल्यानंतर डॉक्टर काय करतात याच्याशी रुग्णालय प्रशासनास काही देणे घेणे नाही त्यामुळे आम्ही त्यांच्यावर कारवाई करू शकत नाहीत.
–डॉ.शंकर धपाटे
अधिष्ठाता स्वाराती वै.म.व.ग्रा.रू.अंबाजोगाई

# केज शहरात पथदिव्यांचा झगमगाट!

**दिलासा:** तीन वर्षांपासून पथदिवे होते बंद



केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

राष्ट्रीय महामार्गाच्या कामामुळे केज शहरातील मुख्य रस्त्यावरील पथदिवे मागील तीन वर्षांपासून बंद होते. नव्याने बसविण्यात आलेल्या पोलवरील पथदिवे नगरपंचायतीने कार्यान्वित आल्याने बीड रस्ता शुक्रवारी उजळून निघाला. केज शहरातून गेलेल्या राष्ट्रीय महामार्गाच्या रस्त्याचे काम पूर्ण होईपर्यंत रस्त्यावरील पथदिवे बंद होते. दुभाजकामध्ये पथदिव्यांसाठी पोल उभे करण्यात आले होते. मात्र तांत्रिक अडचणीमुळे पथदिवे कार्यान्वित करण्यात आले नव्हते. गणेश विसर्जनाला पथदिवे कार्यान्वित करण्यासाठी नगरपंचायतीच्या नगराध्यक्षा सीता बनसोड व जनविकास परिवर्तन आघाडीचे प्रमुख हारून इनामदार यांनी पथदिव्यांसाठी स्वतंत्र डीपी बसवून प्रत्येक पोलचे विद्युतीकरणाचे काम पूर्ण करून पथदिव्याची टेस्टिंग करून घेतली होती. मात्र एक पोल बसविण्याचा राहिल्यामुळे पथदिवे कार्यान्वित केले नव्हते. गुरुवारी पोल उभा करून घेत शुक्रवारी पथदिवे कार्यान्वित करण्यात आले आहेत. तीन वर्षांच्या प्रदीर्घ कालावधीनंतर बीड रस्ता उजळून निघाला असून अंधार दूर झाला आहे.

# गाव विकासात सोळंके कुटुंबाचे योगदान!

**भागवत दराडे :** जैतापूर येथे विकास कामांचे उदघाटन

दिंद्रुड/पुण्यभूमी प्रतिनिधी

धारूर तालुक्यातील जैतापूर देवठाणा ग्रुप ग्रामपंचायत येथे आमदार प्रकाशदादा सोळंके व युवा नेते जयसिंगभैय्या सोळंके यांच्या माध्यमातून प्राप्त निधी ९ कोटी ७० लक्ष रुपयांच्या विविध विकास कामांचे लोकार्पण व उद्घाटन कार्यक्रमाचे आयोजन रविवारी करण्यात आले होते.

जैतापूर व देवठाणा ग्रुप ग्रामपंचायत अंतर्गत गावात विविध विकास कामे सरपंच भागवत दराडे यांच्या कर्तव्य तत्परतेमुळे पुर्ण होत आहेत. रस्ते,वीज,पाणी व शिक्षण या विविध बाबींसाठी आमदार प्रकाश दादा सोळंके व युवा नेते माजी जि प सभापती जयसिंगभैय्या सोळंके यांच्या माध्यमातून विकास कामाची गंगा आपल्या गावात आणण्यासाठी दराडे यांनी कसोशीने प्रयत्न केले आहेत.त्याचे फळ म्हणून गावात सदनता निर्माण होण्यास मदत झाली आहे. दराडे यांच्या गावाप्रती सजगतेमुळे प्रथमच आपण इतका मोठा निधी एका ग्रामपंचायत साठी दिला असल्याचे आमदार सोळंके यांनी मनोगतात व्यक्त केले. याप्रसंगी आमदार सोळंके व युवा नेते जयसिंह सोळंके यांचे

पान २ वर...



जैतापुर येथील नदीवर गेटेड बंधारा, गावात सभामंडळ, देवठाणा येथे सभा मंडळ ,सजगणित तांडा येथे शाळा खोली बांधकाम ,शेरी तांडा येथे सिमेंट रस्ता, जैतापूर गावांतर्गत सिमेंट रस्ता, जैतापूर येथे पिवर ब्लॉक काम, नागझरी तांडा येथे सभामंडप आदी कामांचे लोकार्पण करण्यात आले.

# पूर्वेशजी सरनाईक यांचा सत्कार

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

पूर्वेशजी प्रताप सरनाईक युवासेना कार्याध्यक्ष आणि किरणजी साळी युवासेना सचिव यांचे काल बीडमध्ये आगमन झाले असता शिवसेना जिल्हाप्रमुख मा. अनिलदादा जगताप आणि सचिन भैय्या मुळूक यांच्या वतीने माजी जिल्हा परिषद सदस्य किशोर जगताप यांच्यासह बीड शिवसेना महिला आघाडी, युवासेना आजी–माजी पदाधिकारी–लोकप्रतिनिधी आणि शिवसैनिक यांनी शिवसेना मध्यवर्ती कार्यलयात पुष्पगुच्छ देऊन स्वागत सत्कार केला.



# लोणी येथील कार्यकर्त्यांचा पक्षप्रवेश

**पक्षांतर:** राजेभाऊ फड यांच्या उपस्थितीत प्रवेश

परळी पुण्यभूमी/प्रतिनिधी :–

परळी तालुक्यातील लोणी येथील शेकडो असंख्य युवक कार्यकर्त्यांचा युवक नेते राजेभाऊ फड यांच्या उपस्थितीत जाहिर प्रवेश करण्यात आला. राजेभाऊ फड यांनी प्रवेश केलेल्या सर्वांच्या गळ्यात पक्षाचा रुमाल टाकून सर्वांचे स्वागत करून आगामी वाटचालीस शुभेच्छा दिल्या. राष्ट्रवादी काँग्रेस भटक्या विमुक्त सेलचे अध्यक्ष गणेश देवकते यांच्या नेतृत्वात कार्यकर्त्यांनी प्रवेश केला. लोणी येथील युवा कार्यकर्ते भागवत काचगुंडे यांची राष्ट्रवादी काँग्रेस भटक्या विमुक्त सेल परळी वैजनाथ तालुका सचिवपदी राजेभाऊ फड यांच्या हस्ते दिले नियुक्तीपत्र देऊन निवड करण्यात आली.


परळी शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथील राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे युवा नेते राजेभाऊ फड यांच्या विधानसभा संपर्क कार्यालयात परळी तालुक्यातील लोणी येथील असंख्य युवक कार्यकर्ते यांनी युवा नेते राजेभाऊ फड यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गट पार्टीत जाहीर प्रवेश केला. युवा नेते राजेभाऊ फड यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये प्रभाकर काचगुंडे, रघुनाथ काचगुंडे, धम्म केदारे, प्रल्हाद सोनवणे, बंटी सोनवणे, कृष्ण देवकते, अमोल देवकते, तुकाराम काचगुंडे, गणेशराव देवकते, भागवत काचगुंडे, भगवान मंजुळ, सुदाम केदारे,

पान २ वर...




# 'मांजरा'चे दोन दरवाजातून विसर्ग!

**अस्मानी:** नागरिकांना सतर्कतेच दिला इशारा



केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

सध्या पाऊस नसला तरी मांजरा नदीतून धनेगाव (ता. केज) येथील मांजरा धरणात पाण्याची आवक सुरू झाली आहे. त्यामुळे धरणाची पाणी पातळी नियंत्रित ठेवण्यासाठी रविवारी (दि. १३) सकाळी ७ वाजता दोन दरवाजे २५ सेंटीमीटरने उघडून पाण्याचा विसर्ग केला जात आहे. यंदा धनेगाव (ता. केज) येथील मांजरा धरण क्षेत्रात तब्बल ९४४ मिलिमीटर पाऊस झाला आहे. तर १५ ऑगस्टनंतर अवघ्या दीड महिन्यात धरण हे ओव्हरफ्लो झाले. त्यामुळे उन्हाळ्यात मृतसाठ्यात गेलेले धरण भरल्याने धरणावरून पाणी पुरवठा असलेल्या लातूर शहर, लातूर एमआयडीसी, अंबाजोगाई, केज, धारूर, कळंब या शहरासह ६१ गावांना व सिंचनासाठी पाण्याचा वापर करणाऱ्या धरण परिसरातील गावांसह धरणाखालच्या ६३ गावांतील शेतकऱ्यांना दिलासा मिळाला. २५ सप्टेंबरपासून धरणात येणाऱ्या पाण्याची आवक पाहून पाणी पातळी नियंत्रित ठेवण्यासाठी धरणाचे दरवाजे अधूनमधून उघडून रविवारी सायंकाळी केज शहरात अर्धातास पाऊस झाला. यामुळे शहरातील रस्त्यावर

पान २ वर...

# ठरवाल ते धोरण,बांधाल तेच तोरण!

**नितीन नाईकनवरे:** कार्यकर्त्यांनी घेतला बैठकीत एकमुखी निर्णय

माजलगाव/पुण्यभूमी प्रतिनिधी

१४ ऑगस्ट रोजी नितीन नाईकनवरे यांचा वाढदिवस साजरा झाला.यावेळी विधानसभेच्या अनुषंगाने मोठे शक्ती प्रदर्शन करण्यात आले होते.याची नोंद विविध राजकीय पक्षांनी घेतली होती.दरम्यान सोमवार दि.१४ रोजीनितीन नाईकनवरे यांच्या निवासस्थानी आयोजित कार्यकर्ता बैठकीत तुम्ही ठरवाल ते धोरण आणि बांधताल ते तोरण असा एकमुखी निर्णय प्रमुख कार्यकर्तासह सरपंचांच्या बैठकीत घेण्यात आला.यातून वरिष्ठांच्या संकेत मिळताच नितीन नाईकनवरे विधानसभेच्या कामाला लागल्याचे दिसत आहे.

माजलगाव बाजार समितीचे माजी सभापती नितीन नाईकनवरे यांच्या निवासस्थानी सोमवार दि.१४ रोजी दुपारी कार्यकर्ता बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.येत्या विधान सभेत आपली उमेदवारी असावी किंवा नाही.याच्या चाचपणीसाठी या बैठकीचे आयोजित करण्यात आले होते.तत्पूर्वी १४ ऑगस्ट रोजी नितीन नाईकनवरे यांच्या वाढदिवसानिमित्त मोठे शक्ती प्रदर्शन करण्यात आले होते.याची नोंद राजकीय पक्षांनी घेतली असल्याची माहिती आहे.त्यामुळे वरचे संकेत मिळतात नितीन नाईकनवरे कामाला लागले आहेत. यावेळी आयोजित कार्यकर्ता बैठकीला पंचक्रोशीतून प्रमुख कार्यकर्त्यांनी बैठकीत उपस्थिती लावली होती.दरम्यान सर्वच उपस्थित कार्यकर्त्यांनी नितीन नाईकनवरे यांना विधानसभा लढवण्याचा आग्रह केला.दादा, तुमचे काम सर्व व्यापक आहे.सर्व जाती धर्मात आपल्याला मानणारा वर्ग आहे.समाज उपयोगी अनेक काम आपण मार्गी लावली आहेत. त्यामुळे येत्या विधानसभेत नेतृत्व करण्याची आपली धमक आहे. आपण कोणत्याही पक्षाकडून उमेदवारी घ्या.आम्ही तुमच्या सोबत आहोत.आपण बांधाल ते धोरण आणि

पान २ वर...



# शंभर टक्के अनुदान देण्याचा निर्णय घ्या

**प्राचार्य मुंडे :** कृती समितीचे अजीत पवारांना पत्र

परळी/पुण्यभूमी प्रतिनिधी

२००१ पूर्वीच्या वरिष्ठ ७८ महाविद्यालयांना शंभर टक्के अनुदान देण्याचा निर्णय घ्यावा अशा आशयाची मागणी महाराष्ट्र राज्य कृती समितीने अजितदादा पवार यांचे कडे केली आहे. या पत्रात म्हंटले आहे क, साहेब, आम्ही महाराष्ट्र राज्य कृती समिती (मुंडे) च्या वतीने आपणास नम्र विनंती करतो आहे की, सदर महाविद्यालयांना शंभर टक्के अनुदान देण्यासंदर्भात गेली तीन वर्षापासून आपण टाळाटाळीची उत्तरे देऊन केवळ खेळवत ठेवलेलं आहे. आमच्या या सदर महाविद्यालयांची अनुदान देण्यासंदर्भातील आपल्या शासकीय पातळीवरून तीन ते चार वेळा तपासणी ही पूर्ण झालेली आहे. तरीही, अद्यापही आपण हा निर्णय घेण्यास टाळाटाळ करत असल्याचे स्पष्टपणे दिसत आहे. साहेब आमचा सहनशीलतेचा अंत आता संपलेला आहे. विधानसभेच्या निवडणुकीमध्ये आम्ही महाराष्ट्रातील सर्व कर्मचारी महायुतीचा किंवा आपल्या पक्षाचा एकही उमेदवार फिरू देणार नाही. निवडणुकीमध्ये आम्ही हजारो शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी व सर्व विद्यार्थी आपल्याला योग्य ती जागा दाखवून देईल.

गेली तेवीस वर्षांपासून उध्वस्त झालेल्या आपल्या लाडक्या भावा–बहिणींचं आयुष्य आपल्या या निर्णयाद्वारे उभा करून त्यांना आपण न्याय द्यावा. ही नम्र विनंती.आपण

पान २ वर...



**सुजात आंबेडकर** | धम्म मेळावा उत्स्फूर्तपणे साजरा

# आपली चळवळ शुन्यातून निर्माण झाली

अप्पासाहेब मकासरे/नगर

आपण आपला इतिहास जर तपासून पाहिला तर लक्षात येईल की ही चळवळ शुन्यातून सुरू आहे अकोल्यात जातीयवादाच्या एवढा धाक होता की लोक आपल्या सभांना यायला घाबरत होते त्यामुळे सभा बाजारपेठात घेव्या लागत होत्या कारण येणाऱ्या जाणाऱ्या लोकांच्या कानावर आपले शब्द पडावे त्या वेळची परिस्थिती बघा व आजची परिस्थिती मग कळेल की चळवळ कुठुन सुरू झाली व कुठे पोहचली असे प्रतिपादन युवा नेते सुजात दादा आंबेडकर यांनी अकोल्याच्या भव्य दिव्य धम्म मेळाव्यात केले

ते पुढे म्हणाले की आपल्या अकोल्याचा इतिहास पाहिला तर जेव्हा पहिल्यांदा बाळासाहेब आंबेडकर आले तेव्हा काय परिस्थिती होती लंकेश्वर गुरुजी आणि भारतीय बौद्ध महासभेच्या टीमने पायी फिरून बैलगाडी प्रवास करून एसटीने प्रवास करत जिल्ह्याचे राजकारण उभे केले आणि आज ते तुम्हाला दिसत आहे आपली लढाई एका रात्रीत किंवा निवडणुकीत संपणार आहे का तर नाही ही लढाई लांबच्या पल्याची आहे गौतम बुद्ध छत्रपती शिवाजी महाराज महात्मा फुले डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्यापासून

आपल्यापर्यंत पोहोचलेली ही लढाई आहे ती एका रात्रीत संपणारी लढाई नाही पहिले त्यांनी चर्चा हल्ला केला मशीद वर हल्ला केला आता हे आपल्या बुद्ध लेण्या आणि आपल्या दीक्षाभूमीवर येऊन पोहोचले आहे. दीक्षाभूमी पार्किंगच्या नावाखाली तोडण्याचा प्लॅन या भाजपने केला आहे मला गर्व आहे की की जे आंबेडकर चळवळीतील ज्येष्ठ होते मार्गदर्शक होते त्यांनी माझ्यासारख्या तरुणांना तिकडच्या प्रस्थापित पक्षाच्या दावणीला बांधलं नाही याचा मला ठाम अभिमान आहे ठाम गर्व आहे असे त्यांनी आपल्या भाषणात प्रतिपादन केले



# शेतीसाठी शेकापचा खटारा निवडून द्या

**ॲड नारायण गोले:** सिमरी पारगाव येथे संवाद

माजलगाव/ पुण्यभूमी प्रतिनिधी

निवडणूक जाती धर्मासाठी नाही तर शेतीसाठी झाली पाहिजे, शेतकऱ्याच्या प्रश्नाला वाचा फोडण्यासाठी झाली पाहिजे पण दुर्दैवाने तसे होताना दिसत नाही अलीकडे जातीला, धर्माला भांडवलदारी पक्ष, विकृत मनोवृत्तीचे भ्रष्टाचारी पुढारी महत्त्व देत असून शेतकऱ्याचे, कामगारांचे, कष्टकऱ्यांचे प्रश्न प्रलंबित असताना त्यावर कोणीही बोलायला तयार नाही उलट गेल्या दहा वर्षात शेतकऱ्यांच्या आत्महत्येचा आकडा हजारोच्या संख्येने वाढत असताना प्रस्थापित पुढारी केवळ घराणेशाही जोपासण्यात आणि भ्रष्टाचारातून माया जमवण्यात व्यस्त असताना कष्टकऱ्यांनी भ्रष्टाचारी आणि भांडवलदारी पुढार्याकडून आणि भांडवलदारी पक्षाकडून आपल्या हिताची जोपासना होईल अशी अपेक्षा ठेवणे चुकीचे असून शेतकऱ्यांच्या हितासाठी आणि प्रश्नासाठी रस्त्यावर उतरून हमीभावासह शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नावर आंदोलने, मोर्चे करून प्रशासनाला आणि शासनाला धारेवर धरणारा शेतकऱ्याच्या कुटुंबातील उमेदवार विधानसभेत गेला पाहिजे, बीड जिल्हा क्रांतिसिंह नाना पाटील, गंगाधर आप्पा बुरांडे यांच्यासह आदि लाल बावट्यांच्या नेत्यांच्या विचाराचा असुन कष्टकऱ्यांच्या, शेतकऱ्याच्या आणि कामगारांच्या जीवनामध्ये क्रांती करण्यासाठी माजलगाव विधानसभेवर शेतकरी कामगार

पान २ वर...

